# दुसरे यकृत प्रत्यारोपण 'एमजीएम'मध्ये यशस्वी



औरंगाबाद : यकृत घेऊन जाताना एमजीएमचे डॉक्टर व कर्मचारी.

**औरंगाबाद, ता. १७ :** नागपूर येथे मेंदूचे कार्य थांबलेल्या (ब्रेनडेड) रुग्णाचे यकृत मुंबईतील रुग्णावर शहरातील एमजीएम रुग्णालयात यशस्वी प्रत्यारोपण करण्यात आले. एमजीएममध्ये तीन महिन्यांत यकृत प्रत्यारोपणाची मराठवाड्यातील ही दुसरी घटना आहे, अशी माहिती डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी दिली.

मुंबईतील ६९ वर्षीय रुग्णाला यकृताची गरज होती. प्रत्यारोपणासंदर्भातील संपूर्ण चाचण्या पूर्ण झाल्यानंतर या रुग्णावर यकृत प्रत्यारोपणाचा निर्णय घेण्यात आला. ग्लोबल हॉस्पिटल, मुंबई येथील डॉक्टरांच्या टीमने नागपूर येथून चार्टर फ्लाईटने औरंगाबादेत शनिवारी (ता. १७) सायंकाळी सहाच्या सुमारास यकृत एमजीएम हॉस्पिटलमध्ये आणले. या वेळेत त्या मार्गावर ग्रीन कॉरिडॉर लावण्यात आला होता. डॉ. प्रवीण सूर्यवंशी, डॉ. रवी मोहका, डॉ. प्रशांत राव, डॉ. नारायण सानप, डॉ. अमोल, डॉ. नागेश जंबुरे यांनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया केली. रात्री उशिरापर्यंत प्रत्यारोपण प्रक्रिया सुरू होती. आतापर्यंत ब्रेनडेड झालेल्या

पान ६ वर »

# औरंगाबादेत दोन्ही किडनींचे प्रत्यारोपण

## एमजीएम, कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये दोघांना जीवनदान



# अवयवदानामुळे दुसऱ्यांना जीवदान मिळू शकते : डॉ. गुंडरे

**औरंगाबाद • डीबी स्टार**

इतर देशांच्या तुलनेत आपल्या देशात अवयवदानाचे प्रमाण कमी आहे. आज अनेकांना अवयवदानाची गरज आहे. अवयवदानामुळे दुसऱ्यांना जीवदान मिळू शकते, असे प्रतिपादन एमआयटी हॉस्पिटलचे फिजिशियन डॉ. रोहन गुंडरे यांनी केले.

वसंतराव नाईक महाविद्यालयात महाअवयवदान मोहिमेनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. सुभाष चव्हाण, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. डी. के. दराडे उपस्थित होते. डॉ. गुंडरे म्हणाले, नेत्र, त्वचा, हृदय, यकृत, मेंदू दान केल्याने गरजवंताला जीवदान मिळू शकते. जिवंत किंवा मृत व्यक्तीसुद्धा अवयवदान करू शकतात.' कार्यक्रम यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. महेश कुलथे, डॉ. सुनीता राठोड, प्रा. गजानन [illegible] आदींनी परिश्रम घेतले.

महाअवयवदानानिमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना या वेळी पारितोषिके देण्यात आली. रांगोळी स्पर्धेत रिता धानोरकर, प्रगती नागुरे, पूजा बोरा तसेच निबंध [illegible] नागुरे, कमलाकर लांडगे यांना बक्षिसे मिळाली. चित्रकला स्पर्धेत दीपक ढाकणे, मयूरी कुलकर्णी, कोमल शेजवळ आणि पोस्टर्स स्पर्धेत आरती गावंडे, कोमल शेजवळ, ऐश्वर्या झिने यांना सन्मानित करण्यात आले.



वसंतराव नाईक महाविद्यालयात महाअवयवदान मोहिमेनिमित्त आयोजित विविध स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करताना मान्यवर.

**नागपुरात रुग्ण ब्रेनडेड: चार्टर प्लेनने ५० मिनिटांत शहरात आले यकृत**

# शहरात यकृत प्रत्यारोपण

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** नागपूर येथील ब्रेनडेड रुग्णाच्या अवयवदानाने शनिवारी औरंगाबादेत प्रथमच हवाई मार्गाने यकृत आले. नागपूर ते औरंगाबाद असा हवाई प्रवास ५० मिनिटांत पूर्ण करून चार्टर प्लेन शहरात दाखल झाले आणि मुंबईच्या एका ६९ वर्षीय रुग्णावर प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली. तीन महिन्यांनंतर दुसऱ्यांदा यकृत प्रत्यारोपण झाले.

एमजीएम रुग्णालयात यकृत प्रत्यारोपणाची ही शस्त्रक्रिया झाली. रुग्णालयाचे उपअधिष्ठाता डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. नागपुरात ५२ वर्षीय रुग्णास ब्रेनडेड घोषित केल्यानंतर अवयवदानाची प्रक्रिया सुरू होती. सदर रुग्णाचे हृदय चेन्नई, दोन्ही किडन्या नागपूर येथे, तर यकृताचे औरंगाबादेत प्रत्यारोपण करण्याचा निर्णय घेण्यात आला. ब्रेनडेड रुग्णाचे यकृत चांगले असल्याची सूचना मिळताच शनिवारी दुपारी 'एमजीएम'मध्ये दुपारी २ वाजता यकृत काढण्याची शस्त्रक्रिया सुरू झाली. थेट दिल्लीवरून चार्टर प्लेन नागपुरात आले. त्यातून मुंबईतील ग्लोबल हॉस्पिटलच्या डॉक्टरांचे पथक यकृत घेऊन औरंगाबादेत आले. चिकलठाणा विमानतळ ते एमजीएम रुग्णालयापर्यंत ग्रीन कॉरिडॉर करण्यात आला. यकृत घेऊन पथक दाखल झाले अन सायं.६ वाजता प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया सुरू झाली. रात्री उशिरापर्यंत ही शस्त्रक्रिया चालली. प्रत्यारोपणासाठी डॉ. प्रवीण सूर्यवंशी, 'झेडटीसीसी'चे अध्यक्ष डॉ. सुधीर कुलकर्णी, डॉ. रवी मोहका, डॉ. प्रशांत राव, डॉ. नारायण सानप, डॉ. नागेश जंबुरे यांच्यासह ग्लोबल हॉस्पिटलचे पथक, एमजीएम रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**विमानाची शोधाशोध**

- यकृत आणण्यासाठी चार्टर फ्लाईटचा बराच शोध घेण्यात आला; परंतु ते वेळेवर मिळू शकले नाही. दिल्ली येथे ते उपलब्ध असल्याचे समजल्यानंतर दिल्लीहून नागपूर आणि त्यानंतर ते औरंगाबादेत आले. यात बराच वेळ गेला.

Hello Aurangabad
Page No. 3 Feb 18, 2018
Powered by: erelego.com

# अवयवदात्यांच्या नातेवाइकांना मिळणार ५ लाख!

**औरंगाबाद / तुषार वखरे**

स्पेन, इंग्लंड व अन्य काही देशांशी तुलना केल्यास भारतात अवयवदान करणाऱ्यांची संख्या फारच अत्यल्प आहे. मेट्रो सिटी वगळता अन्य शहरांमध्ये अवयवदानाबद्दल केवळ चर्चा होते. प्रत्यक्षात ब्रेनडेड झालेल्या व्यक्तींचे नातेवाईक अवयवदान करण्यास प्रवृत्त होत नाहीत. अवयवदानाद्वारे इतरांच्या जीवनात नवसंजीवनी मिळावी, नवे आयुष्य पुन्हा जगता यावे यासाठी आता आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयानेच पुढाकार घेतला आहे. अवयवदान करणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांना आर्थिक मदतीसह सरकारी नोकरी देण्याचा विचार करण्यात येत आहे. यासंदर्भातील सूचना नुकत्याच मागविण्यात आल्या आहेत.

एखादा ब्रेनडेड रुग्ण आढळल्यास डॉक्टर तसेच प्रत्यारोपण यंत्रणेलाच नातेवाइकांची मनधरणी करावी लागते. रूढी, परंपरांना छेद देऊन इतरांच्या आयुष्यात आपल्यातून गेलेल्याद्वारे नवसंजीवनी देता येते, हे पटवून देताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. हा कसरतीचा सामना कमी करण्याबरोबरच देशामध्ये अवयवदानाची चळवळ सक्रिय करण्यासाठी आता शासनानेच पुढाकार घेतला आहे. ब्रेनडेडनंतर अवयवदात्यांच्या कुटुंबीयांना कोणतीही मदत होत नाही, त्यांना मदत म्हणून आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने प्रस्ताव तयार करून तो केंद्र सरकारकडे पाठविला आहे. या प्रस्तावानुसार पाच वर्षे दरवर्षी एक लाख रुपये आणि वैद्यकीय लाभ अवयवदात्यांच्या कुटुंबीयांना देण्याचे विचाराधीन आहे. यासंदर्भात तज्ज्ञांकडून सूचना मागविण्यात आल्यात आहेत. झोनल ट्रान्सप्लांट को-ऑर्डिनेशन सेंटरला (झेडटीसीसी) यासंदर्भातील सूचना मागविल्या आहेत. झेडटीसीसीतील प्रमुखांना याची माहिती आगामी पंधरा दिवसांमध्ये सादर करावयाची आहे.

- **आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचा प्रस्ताव**
- **प्रत्यारोपण समितीमार्फत मागविला अभिप्राय**

**सूचना पाठविण्यात येईल**

"कुटुंबीयांना मदत करावी का? यासंदर्भातील प्रस्ताव आरोग्य कुटुंब कल्याण मंत्रालयाने तयार केला आहे. हा प्रस्ताव मंत्रालयाकडून केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला आहे. या प्रस्तावाबाबत अभिप्राय व सूचना करण्याचे आवाहन झेडटीसीसीला करण्यात आले आहे. पंधरा दिवसांमध्ये अभिप्राय सादर करण्यात येणार आहे.

– डॉ. सुधीर कुलकर्णी, समन्वयक, विभागीय प्रत्यारोपण समिती

# २४ तासांत शहरात दुसरे अवयवदान

१५ वर्षीय मुलाने दिले चौघांना जीवदान अन् एकाला दृष्टी



# ६० वर्षीय ८ पदयात्रींनी वेधले लक्ष, अवयवदान जागृतीसाठीचा संकल्प दृढ

४० दिवस मराठवाडाभर पिंजून काढणार परिसर, रक्तदान-नेत्रदान जागृती करणार

**प्रतिनिधी** | औरंगाबाद



मानवी शरीराच्या प्रत्येक अवयवाचा त्याच्या मृत्यूनंतरही वापर झाला पाहिजे, त्यातून इतरांना जीवन मिळाले पाहिजे, असा विचार शास्त्रज्ञांनी केला. अवयव प्रत्यारोपणाच्या माध्यमातून तो यशस्वीही झाला. मात्र, जनजागृतीअभावी आजही हजारोंना मृत्यूच्या दारात जावे लागते. याविषयी जनजागृती केल्यास प्रत्येक गरजूला जीवनदान मिळणे सहज होईल, या उद्देशाने ६० वर्षांच्या ८ जणांनी मराठवाडा पिंजून पदयात्रा करण्याचा संकल्प केला आहे. त्याला आजपासून (१६ नोव्हेंबर) सुरुवात झाली.

विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती, महात्मा गांधी मिशन ट्रस्ट आणि द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी (१६ नोव्हेंबर) सकाळी ८.३० वाजता एम.जी.एम. वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयापासून या पदयात्रेला सुरुवात झाली.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. कालिदास चव्हाण यांनी पदयात्रेला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली. या वेळी एमजीएम चे विश्वस्त अंकुशराव कदम, प्रतापराव बोराडे, विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ. सुधीर कुलकर्णी, समन्वयक मनोज गाडेकर, जगेश धवाले, द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशनचे अध्यक्ष पुरुषोत्तम पवार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे उपअधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे आणि शासकीय कर्करोग रुग्णालयाचे डॉ. अरविंद गायकवाड उपस्थित होते.

भारतात अपघातांमुळे जखमी होऊन ब्रेनडेड होणाऱ्यांची संख्या मोठी आहे. जनजागृतीमुळे अशा ब्रेनडेड रुग्णांचे अवयव इतर गरजूंना प्रत्यारोपित करता येतील. त्यांना यातून जीवनदान मिळेल, असा उद्देश यामध्ये आहे. अंधश्रद्धा आणि भ्रामक कल्पना यामुळे अवयवदान करण्याविषयी जनमानसात अनेक संभ्रम आहेत, ते दूर करण्याच्या दृष्टीने विविध ठिकाणी संवाद साधण्याचे काम हे ८ दूत करणार आहेत. यासोबतच एमजीएमचे नर्सिंग कॉलेज, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. कार्यक्रमासाठी समन्वय समितीचे समन्वयक मनोज गाडेकर व जगेश धवाले यांनी प्रयत्न केले.

---

**सोहळा** | दिल्लीत आयोजित कार्यक्रमात राम मगरच्या आई मंदाबाई मगर यांचा सन्मान

# अवयवदान करणाऱ्या कुटुंबीयांचा उपराष्ट्रपती नायडूंच्या हस्ते सत्कार

## अवयव दान झालेल्या ९ कुटुंबांचा सन्मान

प्रतिनिधी । औरंगाबाद

**अवयव दान करणाऱ्या कुटुंबीयांना नायडू यांनी केला सलाम**





### डॉक्टरांच्या समुपदेशनाने मिळाली प्रेरणा

[illegible]

---

# यकृताचे दान ठरले रुग्णासाठी जीवनदान

औरंगाबादच्या ब्रेनडेड तरुणाच्या यकृताचे पुण्यात प्रत्यारोपण

[illegible]

> ब्रेनडेड तरुणाचे वडील रिक्षाचालक आहेत, तो त्यांचा एकुलता एक मुलगा होता. त्यांनी योग्य वेळी अवयवदानासाठी संमती दिली. ही बाब नक्कीच प्रेरणादायी आहे. त्यामुळे एका रुग्णाच्या जीवनात चैतन्य निर्माण झाले.
>
> डॉ. प्रवीण सूर्यवंशी, उपअधिष्ठाता, एमजीएम रुग्णालय

---

लोकमत

**ब्रेनडेड** : रिक्षाचालक पित्याने घेतला अवयवदानाचा निर्णय

# युवकाचे यकृतदान; एकाला नवे आयुष्य

लोकमत न्यूज नेटवर्क



प्रवीण काकडे

### स्वत:च्या रिक्षातून मुलगा रुग्णालयात

### हवाई कनेक्टिव्हिटीचा फटका

[illegible]

Hello Aurangabad
Page No. 3 May 03, 2018
Powered by: erelego.com

---

# अडचणींचा सामना करत अखेर 'यकृत' दान

औरंगाबाद/प्रतिनिधी

**ब्रेनडेड झालेल्या रुग्णाच्या नातेवाईकांनी अवयवदानाचा निर्णय घेतला, परंतु, अवयवाचे दान गरजूंपर्यंत पाठविताना असंख्य अडचणींचा डोंगर समोर आला, त्यावर मात करून तब्बल एक दिवसानंतर यकृताचे दान करण्यात आले. या दानामुळे एकाला नवआयुष्य मिळाले आहे.**

वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील एमजीएम हॉस्पिटलमध्ये चार दिवसांपूर्वी रामनगर येथील प्रवीण हनुमंतराव काकडे (२२) या तरुणाला रक्ताची उलटी झाली म्हणून उपचारार्थ दाखल करण्यात आले. प्रकृतीने साथ न दिल्याने ३० एप्रिल रोजी दुपारी तो ब्रेनडेड झाला. त्याच्या नातेवाईकांना कल्पना देऊन अवयवदानासंदर्भात माहिती देण्यात आली. नातेवाईकांनी संमती दर्शविल्यानंतर प्रक्रिया सुरू झाली. उपचारादरम्यान त्याला सीपीआर दिल्याने हृदयदान करणे अशक्य होते. डॉक्टरांनी उशिरापर्यंत टू डी इको देण्याचा प्रयत्न केला, परंतु तो अपयशी ठरला. किडनी दान करण्याच्या हालचाली सुरू असतानाच त्याचे स्टोनचे ऑपरेशन झाल्याचे समजले. शिवाय क्रियेटीनचे प्रमाण जास्त पान/६

**नातेवाइकांच्या जागरूकतेने रुग्णास मिळाले नवजीवन**

### एकुलता एक मुलगा गमावला

डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार प्रवीण काकडे हा कुटुंबातील एकुलता एक मुलगा होता. पाच दिवसांपूर्वी नातेवाईकाच्या लग्नाहून आल्यानंतर तो घरासमोर लहान मुलांसमवेत खेळत होता. त्यावेळी त्याला रक्ताच्या उलट्या झाल्या. नातेवाईकांनी स्थानिक डॉक्टरांकडे नेऊन प्राथमिक उपचार केला. परंतु, प्रकृती गंभीर असल्याने त्याला एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान तो ब्रेनडेड झाला. तो जग सोडून गेला तरीही त्याच्या अवयवदानाच्या माध्यमातून इतरांना फायदा होईल, या हेतूने नातेवाईकांनी दान करण्याचा निर्णय घेतला. मात्र, अडचणींचा डोंगर समोर असल्याने काही अवयवांचे दान झाले नाही. निदान यकृत दान होऊन एका रुग्णाच्या आयुष्यात नवसंजीवनी मिळाली याचा आनंद पुत्र गमविलेला असतानाही माने कुटुंबीयांमध्ये आहे.

---

सकाळ

# अवयवदानासाठी मराठवाडाभर जनजागृती

१६ नोव्हेंबर ते २४ डिसेंबरपर्यंत ६७१ किलोमीटरची पदयात्रा



### पदयात्रेत यांचा असणार सहभाग

[illegible]

Aurangabad Aurangabad Today
16/11/2018 Page No. 3



# एकुलत्या एक मुलाचे यकृत दान

## ब्रेन डेड झालेल्या २२ वर्षीय मुलाच्या पित्याने घेतला धीरोदात्त निर्णय

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

मेंदुमध्ये रक्तस्त्राव होऊन एकुलता एक २२ वर्षीय मुलगा चार दिवसांच्या उपचारानंतर ब्रेन डेड झाला. त्याही परिस्थितीत पित्याने धीरोदात्तपणे मुलाच्या अवयवदाचा निर्णय घेतला आणि त्याच मुलाच्या यकृत दानामुळे एकाला जीवनदान मिळाले. शहरातील एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात मंगळवारी (१ मे) अवयवदानाची शस्त्रक्रिया झाल्यानंतर पुण्याच्या सह्याद्री हॉस्पिटलला प्रत्यारोपणासाठी यकृत पाठवण्यात आले. वैद्यकीय कारणांमुळे इतर अवयवांचे दान होऊ शकले नाही.

शहरातील रामनगर येथील रहिवासी आणि डी-फार्मसी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाचा तरूण २६ एप्रिल रोजी चिकलठाणा परिसरात एका लग्नासाठी गेला होता. लग्न सोहळ्यात दिवस घालवून संध्याकाळी घरी परतला आणि क्रिकेट खेळायला गेला. क्रिकेट खेळून घरी आल्यानंतर त्याला रक्ताच्या उलट्या झाल्या म्हणून तातडीने रामनगर परिसरातील खासगी रुग्णालयात नेण्यात आले. त्याच रात्री त्याला गंभीर स्थितीमध्ये एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. वेगवेगळ्या चाचण्यांमध्ये त्याच्या मेंदुमध्ये रक्तस्त्राव झाल्याचे व ब्रेन हॅमरेज झाल्याचे स्पष्ट झाले. त्याच्यावर 'आयसीयू'मध्ये सलग चार दिवस उपचार करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान तो ब्रेन डेड झाला. एकुलता एक मुलगा ब्रेन डेड झाल्याचा जबर धक्का कुटुंबियांना आणि त्यातही त्याच्या वडिलांना बसला. मात्र त्याही अत्यंत दुःखदायक स्थितीत युवकाच्या पित्याने त्याच्या अवयवदानाचा निर्णय घेतला. कुटुंबियांनी त्याच्या सर्व अवयवांच्या दानाचा निर्णय घेतला. मात्र उच्च रक्तदाब व 'सीपीआर'चा गंभीर परिणाम हृदयावर झाला होता आणि हृदयाचे दान करणे शक्य नसल्याचे वेगवेगळ्या चाचण्यांवरुन स्पष्ट झाले होते. तसेच किडनी स्टोनमुळे किडनीचेही दान करणे शक्य झाले नाही. यकृत दान शक्य असल्याचे लक्षात येताच यकृत दानाची तयारी सुरू करण्यात आली. युवकाचा रक्तगट जुळणारा एक रुग्ण शहरात होता; परंतु त्याची प्रत्यारोपणाची तयारी नसल्याने आधी नागपूर येथे प्रयत्न झाले व काही कारणाने नागपूरच्या रुग्णावर प्रत्यारोपण होणे शक्य नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पुण्याच्या सह्याद्री हॉस्पिटलला यकृत पाठवण्याचा निर्णय झाला. एमजीएम रुग्णालयात मंगळवारी सकाळी सह्याद्री हॉस्पिटलची टीम दाखल झाली आणि दुपारी साडेबाराला अवयवदानाची शस्त्रक्रिया पूर्ण होऊन रुग्णवाहिकेद्वारे तातडीने यकृत पाठवण्यात आले, तर दुपारी एक वाजता युवकाचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.



### लाडक्या मित्रासाठी मित्रांची गर्दी

अतिशय मनमिळावू स्वभावामुळे हा युवक आपल्या मित्रांच्या वर्तुळामध्ये अत्यंत लोकप्रिय होता. क्रिकेट त्याचा आवडता खेळ होता व जसे जमेल तसा तो क्रिकेट खेळत असे. त्याचवेळी घरची आर्थिक स्थिती खूप काही चांगली नसल्याने तो सुट्यांमध्ये जमेल तसे कामही करीत असेल. त्याचे वडील रिक्षा चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात व तो युवक त्यांचा एकुलता एक मुलगा होता. त्याला रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्याचे अनेक मित्र रुग्णालयामध्ये तळ ठोकून होते व त्याच्यावरील अंत्यसंस्कारावेळी शंभरपेक्षा जास्त मित्रांनी गर्दी केली होती.

“

संबंधित युवकाला 'सीपीआर' म्हणजेच 'हार्ट पंपिंग' करावे लागले होते. त्यामुळे हृदयदान शक्य नव्हते आणि किडनी स्टोन व किडनीला सूज असल्यामुळे किडनीदानही शक्य झाले नाही. मात्र यकृत दान शक्य असल्याचे लक्षात येताच, त्यासाठी यशस्वी प्रयत्न करण्यात आले. एका युवकाच्या यकृत दानामुळे एका व्यक्तीला जीवनदान मिळाले.

– डॉ. प्रवीण सूर्यवंशी, उपअधिष्ठाता, एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय

### शहरातील १६ वे अवयवदान

१६ जानेवारी २०१६ रोजी शहरामध्ये अवयवदान चळवळीला सुरुवात झाली आणि पाच महिन्यांच्या खंडानंतर १६ वे अवयवदान मंगळवारी (१ एप्रिल) शहरात झाले. यापूर्वी शहरामध्ये शेवटचे अवयवदान हे नोव्हेंबर महिन्यात झाले होते. अवयवदान चळवळीसाठी मराठवाड्यातील रुग्णालयांनी पुढाकार घेऊन असंख्य रुग्णांना जीवनदान मिळवून द्यावे, असे आवाहनही 'झेडटीसीसी'चे अध्यक्ष डॉ. सुधीर कुलकर्णी व समन्वयक मनोज गाडेकर यांनी यानिमित्ताने केले.

# अवयवदानासाठी 'रिट्रायव्हल सेंटर' वाढण्याची गरज



'कॅडेव्हर ट्रान्सप्लांट'च्या वाटचालीमध्ये 'झेडटीसीसी' कार्यान्वित होणे, हे पहिले पाऊल आहे. आता प्रत्येक रुग्णालयामध्ये 'ब्रेन डेड' रुग्णाची वेळेत अधिकृत घोषणा होणे, 'ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेटर'द्वारे 'ब्रेन डेड' रुग्णाच्या नातेवाईकांचे मन अवयवदानासाठी वळवून 'कन्व्हर्जन रेट' वाढवणे आवश्यक आहे. त्याबरोबर शस्त्रक्रियेद्वारे 'ब्रेन डेड' रुग्णाचे अवयव काढण्यासाठी २५ खाटांवरील शासकीय-खासगी रुग्णालयांमध्ये 'नॉन ट्रान्सप्लान्ट ऑर्गन रिट्रायव्हल सेंटर'ची संख्या वाढणे तितकेच गरज आहे. त्यासाठी अशा रुग्णालयांनी लवकरात लवकर शासकीय मान्यता घेणे व 'कॅडेव्हर ट्रान्सप्लान्ट' होण्यासाठी प्रत्यक्ष पुढाकार घेणे अवयवदान चळवळ गतीमान होण्यासाठी तितकेच आवश्यक आहे, असे मत 'झेडटीसीसी'चे प्रभारी अध्यक्ष व ज्येष्ठ मूत्रपिंडविकारतज्ज्ञ डॉ. सुधीर कुलकर्णी यांनी व्यक्त केले.




# महिलेचे अवयवदान; वाचले २ रुग्णांचे प्राण

दै. दिव्य मराठी 23/3/16

# 'एमजीएम'मध्ये यकृत प्रत्यारोपण यशस्वी

## मराठवाड्यातील पहिली शस्त्रक्रिया : ५९ वर्षीय महिला पाचव्या दिवशी ठणठणीत



औरंगाबाद : यकृत प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करणारी डॉक्टरांची टीम.

लोकमत

# 'अवयव'रुपी संपत्तीने गरजू रुग्णांना जीवदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** देशात अवयवांची गरज असलेल्या रुग्णांची संख्या मोठी आहे. परंतु त्या तुलनेत अवयवदान होत नाही. 'अवयव'रुपी संपत्तीने गरजू रुग्णांना जीवदान मिळते. त्यामुळे अवयवदानासंदर्भात जनजागृती होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील डॉ. सरोजिनी जाधव यांनी केले.

इंडियन मेडिकल असोसिएशनतर्फे (आयएमए) शनिवारी समर्थनगर येथील आयएमए हॉलमध्ये 'अवयवदान' या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. मंचावर डॉ. उन्मेष टाकळकर, विभागीय प्रत्यारोपण समन्वय समिती (झेडटीसीसी) चे अध्यक्ष डॉ. सुधीर कुलकर्णी, डॉ. रमाकांत बेंबडे, डॉ. मिलिंद दुनाखे, 'आयएमए'चे अध्यक्ष डॉ. रमेश रोहिवाल उपस्थित होते.

डॉ. सुधीर कुलकर्णी म्हणाले, देशात १९९३ पर्यंत अवयवदानासंदर्भात कोणतेही कायदे अस्तित्वात नव्हते. आता त्यावर सर्व स्तरातून लक्ष ठेवले जात आहे. त्यामुळे कोणताही गैरव्यवहार होत नाही. याप्रसंगी डॉ. कुलदीपसिंग राऊळ, डॉ. यशवंत गाडे, डॉ. उज्ज्वला दहीफळे उपस्थित होते.

Hello Aurangabad
Page No. 8 Aug 27, 2017
Powered by: erelego.com





लोकमत

# ६६३ कि.मी. च्या पदयात्रेत अवयवदानाचा जागर

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** मराठवाड्यात ६६३ कि.मी.ची पदयात्रा काढून ६० ते ७५ वर्षे वयोगटाचे ज्येष्ठ नागरिक गावोगावी अवयवदानाचा जागर करणार आहेत. 'एमजीएम' येथून शुक्रवारी सकाळी ८ वाजता पदयात्रेला सुरुवात होईल.

'एमजीएम' येथे गुरुवारी पत्रकार परिषदेत पदयात्रेविषयी माहिती देण्यात आली. याप्रसंगी 'एमजीएम'चे सचिव अंकुशराव कदम, विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ. सुधीर कुलकर्णी, द फेडरेशन ऑफ ऑर्गन अ‍ॅण्ड बॉडी डोनेशनचे संस्थापक पुरुषोत्तम पवार, सुधीर बागईतकर, रोटरीचे सुहास वैद्य, राजेशसिंह सूर्यवंशी, प्राचार्या डॉ. रेखा शेळके यांच्यासह पदयात्रेत सहभागी होणाऱ्या ज्येष्ठांची उपस्थिती होती. यावेळी पुरुषोत्तम पवार यांनी पदयात्रेविषयी माहिती दिली. यापूर्वी नाशिक ते नागपूर आणि मुंबई, कोकण ते गोवा विभागात पदयात्रा काढून जनप्रबोधन करण्यात आले. या पदयात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये सहभागी होणारे सर्व जण हे वयाची ६० वर्षे पूर्ण केलेले आहेत. पदयात्रेत दयानंद मठपती, वसंत चिकोडे, चंद्रशेखर देशपांडे, शैलेश देशपांडे, अविनाश कुलकर्णी, सुनील देशपांडे, दत्ता कुलकर्णी हे जनजागृती करतील.

**...तरी आम्ही तरुण**

नौदलात सेवा केलेले आणि ७५ वर्षांचे वसंत चिकोडे म्हणाले, तीन लढायांमध्ये सहभागी होतो. वय झाले असले तरी अवयदानाच्या जनजागृतीसाठी प्रयत्न करू शकतो. वय झालेले असले तरी आजही आम्ही तरुण असल्याचे पदयात्रेत सहभागी होणाऱ्या ज्येष्ठांनी म्हटले.



**अवयवदानाच्या जनजागृतीसाठी पदयात्रेत सहभागी होणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसह 'एमजीएम'चे सचिव अंकुशराव कदम, पुरुषोत्तम पवार आदी.**

Hello Aurangabad
Page No. 8 Nov 16, 2018
Powered by: erelego.com

लोकमत

**२१ जणांचे अवयवदान :** अडीच वर्षांत चळवळीला वेग

# अवयवदानाने दिले ६८ जणांना जीवदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** 'मरावे परी कीर्तिरूपी उरावे' या उक्तीप्रमाणे अवयवदान करून समाजासमोर एक आदर्श ठेवला जात आहे. गेल्या अडीच वर्षांत ब्रेनडेड २१ जणांच्या अवयवदानाने ६८ जणांना जीवदान मिळाले, तर २२ जणांना दृष्टी मिळाली.

राज्यात २५ व २६ सप्टेंबर रोजी अवयवदान महोत्सव राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अवयवदानासाठी पारंपरिक मृत्यूची व्याख्या बदलून 'ब्रेन डेड' ही व्याख्या कायद्याने संमत केली आहे. यामध्ये रुग्णाचा मेंदू कार्यरत नसेल तर त्याला मृत घोषित करून कुटुंबियांच्या परवानगीने त्याचे अवयव प्रत्यारोपणासाठी वापरता येतात. औरंगाबादेत १५ जानेवारी २०१६ रोजी राम मगर या ब्रेन डेड तरुणाच्या अवयवदानाने तिघांना नवे आयुष्य मिळाले आणि मराठवाड्यात झाली. गेल्या अडीच वर्षांत २१ अवयवदान झाले. यातून ३८ किडन्या, २१ यकृत, ९ हृदयांचे प्रत्यारोपण झाले. यात २०१६ मध्ये ९, २०१७ मध्ये ६, तसेच नेत्रदानही झाले. या अवयवदानामुळे अनेकांचे आयुष्य बदलून गेले.

**प्रक्रियेचे व्हावे चित्रीकरण**

एका ब्रेन डेड व्यक्तीचे हृदय, यकृत, किडनी, डोळे या अवयवांच्या आयुष्य मिळते. विविध माध्यमातून होणाऱ्या जनजागृतीमुळे मराठवाड्यात रक्तदान, नेत्रदानाबरोबर अवयवदानात वाढ होत असून, ही संकल्पना समाजात हळूहळू रुजू लागली आहे. या अवयवदान प्रक्रियेचे चित्रीकरण व्हावे, त्यातून अधिक पारदर्शकता येईल, अशी अपेक्षा जनजागृती करणाऱ्या व्यक्तींकडून व्यक्त होत आहे. मात्र तांत्रिक अडचणीमुळे हे याचे तज्ज्ञांनी सांगितले.

**चित्रीकरण अशक्य**

◆ अवयवदानाच्या प्रक्रियेचे चित्रीकरण करण्यासंदर्भात सध्या मार्गदर्शक तत्त्वे (गाईडलाईन) नाहीत. शिवाय २४ तास चित्रीकरण करणे अशक्य आहे. त्यामुळे सध्या चित्रीकरण होत नाही. चित्रीकरण करणे म्हणजे डॉक्टरांवर अविश्वास दाखविला, असे होईल. राष्ट्रीय-राज्य पातळीवरच यासंदर्भात निर्णय होऊ शकतो.

-डॉ. सुधीर कुलकर्णी, अध्यक्ष, झेडटीसीसी

**जनजागृतीमुळे वाढ**

जनजागृतीमुळे गेल्या काही वर्षांत अवयवदानात वाढ होत आहे. आधी खूप प्रयत्न करावे लागत. आता अवयवदानासाठी नातेवाईक तयार होतात. विविध कार्यक्रमांतून होणाऱ्या जनजागृतीमुळेच हे शक्य झाले आहे.

- मनोज गाडेकर, समन्वयक, विभागीय अवयव प्रत्यारोपण

# मुंबईला हृदय व लिव्हर, औरंगाबादेत किडनीचे प्रत्यारोपण

'ब्रेनडेड' रुग्ण : घाटी ते विमानतळ तयार केला ग्रीन कॉरिडॉर



**विमानतळावर...**

# एमजीएममध्ये ब्रेन डेड महिलेचे अवयवदान; औरंगाबादेत मूत्रपिंडाचे प्रत्यारोपण, यकृत मुंबईला



दै. लोकसत्ता २१/३/16

...मत

...तील रुग्णांवर अवयव प्रत्यारोपण

# २४ तासांत सात जणांना जीवदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** जालना जिल्ह्यातील वदनापूरच्या लक्ष्मण भोईर यांचे अवयवदान व प्रत्यारोपण यशस्वी झाल्यानंतर शुक्रवारी पंधरावर्षीय युवकाचे अवयवदान करण्यात आले. या अवयवदानामुळे चौघांना जीवदान, तर दोघांना दृष्टी मिळाली. अवघ्या चोवीस तासांत सात जणांना जीवदान मिळण्याची ही शहराच्या इतिहासातील पहिलीच घटना आहे.

वदनापूर येथील पिग्मी एजंट लक्ष्मण काशिनाथ भोईर या ब्रेनडेड रुग्णाच्या अवयवदानानंतर गुरुवारी तिघांना प्रत्यारोपणाद्वारे नवजीवन मिळाले, तर २१ जूनला दुपारी चौकामध्ये १५ वर्षीय प्रतीक बाबासाहेब वाहूळकर याचा अपघात झाला. त्याचे मित्र गणेश वाघ, राजीव खोरे यांच्यासमवेत तो एकाच दुचाकीवरून ...हून घराकडे येत होता.

दुचाकीजवळ एका वाहनाला वाचविण्याच्या प्रयत्नात गणेश वाघ याची दुचाकी दुभाजकावर आदळली. यात गणेशच्या पायाला मार लागला, तर प्रतीकच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, राजीव किरकोळ जखमी झाला होता. त्यानंतर तात्काळ तिघांना एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मेंदूला गंभीर इजा झाल्याने डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले; पण त्यात त्यांना यश येऊ शकले नाही. अखेर २२ जून रोजी तो ब्रेनडेड असल्याचे डॉक्टरांनी नातेवाईकांना सांगितले. विभागीय प्रत्यारोपण समितीचे समन्वयक मनोज गाडेकर यांनी नातेवाईकांना विश्वासात घेऊन अवयवदानाची माहिती दिली.

आई-वडिलांनी संमती दिल्यानंतर दुपारी १ वाजता पहिली तपासणी करण्यात आली. दुसऱ्यांदा तपासणी केल्यानंतर विभागीय प्रत्यारोपण समितीने पुढील सूत्रे हलवली. गरजू व प्रतीक्षेतील रुग्णांचा शोध घेतल्यानंतर शुक्रवारी दान केलेले अवयव गरजू रुग्णांवर प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली. प्रतीकची एक किडनी एमजीएम हॉस्पिटल, दुसरी कमलनयन बजाज हॉस्पिटल, हृदय मुंबईतील फोर्टीज हॉस्पिटल, तर लिव्हर नागपूरच्या न्यू इरा हॉस्पिटलमधील प्रतीक्षेतील रुग्णाला प्रत्यारोपित करण्यात आले. डोळे औरंगाबाद शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पाठविण्यात आल्याचे एमजीएमचे उपअधिष्ठाता तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी सांगितले.

**....आणि विमानतळावर आले चार्टर**

औरंगाबाद विमानतळावर सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत विमानांना उड्डाण घेण्यास वा येण्यास बंदी आहे. प्रतीकचे हृदय नागपूर येथील रुग्णाला देण्याचा निर्णय घेण्यात आला; पण हृदय नागपूरला पाठविणे अशक्य होते. या कारणाने हृदयदानाबाबत साशंकता होती. अखेर केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांनी अत्यावश्यक सेवा म्हणून विमान आणण्यास मान्यता दिली. त्यानुसार मुंबईहून सकाळी ८ वाजता चार्टर विमान औरंगाबादेत आले. दुपारी २.३० वाजता हृदय आणि लिव्हर घेऊन मुंबईकडे रवाना झाले. मुंबईत पोहोचल्यानंतर विमानाने लिव्हर नागपूरला पाठवून प्रत्यारोपित करण्यात आले.

Hello Aurangabad
Page No. 8 Jun 23, 2018
Powered by: erelego.com

लोकमत

**स्थिती :** ७५ रुग्णांना यकृत, तर एकाला हवे हृदय

# मराठवाड्यात २४५ रुग्ण 'किडनी'च्या प्रतीक्षेत

लोकमत न्यूज नेटवर्क

**प्रत्यारोपण केंद्रांचीही गरज**



Hello Aurangabad
Page No. 7 Nov 17, 2018
Powered by: erelego.com

# चार हॉस्पिटल 'रिट्रायव्हल सेंटर'

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

### स्किन बँकेची 'नोटो'मध्ये नोंदणी

शहरातील बेंबडे हॉस्पिटलमधील नियोजित स्किन बँकेची नोंदणी 'नॅशनल ऑर्गन अँड टिश्यू ट्रान्सप्लान्ट ऑर्गनायझेशन'कडे (नोटो) करण्यात आली असून, मान्यतेसाठी लवकरच कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याचे डॉ. रमाकांत बेंबडे यांनी 'मटा'ला सांगितले.



शहरातील तीन ते चार रुग्णालये 'रिट्रायव्हल सेंटर' होण्याची शक्यता असून, परभणी व बीड येथील जिल्हा सामान्य रुग्णालयांनीदेखील मान्यतेसाठी संपर्क साधला आहे. छोट्या-मध्यम जिल्ह्यांमध्ये निदान एक तरी 'रिट्रायव्हल सेंटर' असणे गरजेचे आहे. त्याचबरोबर प्रत्यक्षात अवयवदान होण्यासाठी प्रयत्न होणे महत्वाचे आहे.
– डॉ. सुधीर कुलकर्णी, अध्यक्ष, झेडटीसीसी

शहरातील पाच रुग्णालयांमध्ये थेट अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया होत असल्यामुळे या रुग्णालयांना अवयवदानाच्या शस्त्रक्रियेसाठी आपसूकच मान्यता असते. त्याशिवाय शहरातील चार रुग्णालयांमध्ये अवयवदानाची शस्त्रक्रिया होण्याची चिन्हे असून, त्यासाठी रुग्णालयांना आवश्यक 'नॉन ट्रान्स्प्लान्ट ऑर्गन रिट्रायव्हल सेंटर'ची (एनटीओआरसी) मान्यता मिळण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे झेडटीसीसीने स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर शहरातील एका रुग्णालयामध्ये 'स्किन बँक'लाही मान्यता मिळण्याचे संकेत आहेत.

शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी), युनायटेड सिग्मा हॉस्पिटल, सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल, कमलनयन बजाज हॉस्पिटल, माणिक हॉस्पिटल या पाच रुग्णालयांमध्ये अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया पूर्वीपासून होत आहे. त्यामुळे या रुग्णालयांना आपसूकच 'रिट्रायव्हल सेंटर'ची मान्यता असते. त्याशिवाय एमआयटी हॉस्पिटल, डॉ. हेडगेवार रुग्णालय, दुनाखे हॉस्पिटल, अपेक्स हॉस्पिटल या चार रुग्णालयांनाही 'रिट्रायव्हल सेंटर'ची मान्यता मिळण्यासाठी सकारात्मक हालचाली सुरू झाल्या आहेत. यापैकी एमआयटी हॉस्पिटलकडे अशी मान्यता मिळण्यासाठी अर्ज करण्यात आला आहे आणि आरोग्य संचालक कार्यालयाने अर्ज प्राप्त झाल्याचे एमआयटी हॉस्पिटलला कळविले आहे. त्यासाठी लवकरच पाहणी व कायदेशीर प्रक्रिया करण्यात येईल, असेही संचालक कार्यालयाने कळविल्याचे रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. आनंद निकाळजे यांनी सांगितले. डॉ. हेडगेवार रुग्णालयाला अशी मान्यता घेण्यासाठी विचार सुरू असून, लवकरच अंतिम निर्णय घेतला जाईल, असे वैद्यकीय संचालक डॉ. अनंत पंढरे म्हणाले. दुनाखे हॉस्पिटलमध्ये तसेच अपेक्स हॉस्पिटलमध्ये मान्यता घेण्यासाठी लवकरच प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, असे रुग्णालयाचे प्रमुख अनुक्रमे डॉ. मिलिंद दुनाखे व डॉ. भावना टाकळकर यांनी स्पष्ट केले.

# अवयवदान चळवळीला केंद्राचा 'बूस्टर डोस'

Nikhil.Nirkhee
@timesgroup.com
Tweet : @nnirkheeMT

**औरंगाबाद** : अवयवदान चळवळीला प्रोत्साहनाचा 'बूस्टर डोस' देण्याच्या हेतूने केंद्र सरकारकडून हालचाली सुरू आहेत. चार वेगवेगळ्या स्तरांवर प्रोत्साहनपर आर्थिक निधी देण्याचा विचार होत आहे. यामध्ये अवयवदान करणारा ब्रेन डेड दाता व दात्याचे कुटुंब, अवयवांचे प्रत्यारोपण होणारा रुग्ण तसेच ज्या रुग्णालयामध्ये अवयवदानाची शस्त्रक्रिया होणार आहे, त्या रुग्णालयाचाही विचार केला जात आहे. विभागीय प्रत्यारोपण समन्वय समितीसह अवयवदानाशी संबंधित व्यक्ती व संस्थांना सूचना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मोठ्या शहरांमध्ये अवयवदान सुरू झाले असले तरी एकूण प्रमाण गरजेच्या तुलनेत नगण्य आहे. अवयवदानाचे प्रमाण वाढण्यासाठीच, ब्रेन डेड दात्याच्या कुटुंबाला पाच लाख रुपये (प्रत्येक वर्षी एक लाख) देण्यासोबतच कुटुंबातील व्यक्तीला सरकारी नोकरी देता येऊ शकते का किंवा आणखी काही मदत करता येऊ शकते का, याचा निर्णय होणार आहे. ज्या रुग्णांवर अवयवांचे प्रत्यारोपण झाले आहे, त्या रुग्णांना औषधे (इम्युनोसप्रेसन्टस्) देण्याचाही विचार सुरू आहे. या औषधांचा खर्च भागवणे सामान्यांसाठी एक दिव्य असते. अवयवदान शस्त्रक्रिया होणाऱ्या रुग्णालयांस प्रोत्साहनपर निधीचा विचारही होत आहे. अवयवदानासाठी निकष पूर्ण करणाऱ्या रुग्णालयांमध्ये समन्वयकाचे वेतन देण्याचाही केंद्राकडून विचार सुरू आहे.

### एका दात्यामागे ५० हजार रुपये?

ज्या रुग्णालयांमध्ये अवयवदानाची शस्त्रक्रिया होते, त्या रुग्णालयांना प्रत्येक ब्रेन डेड रुग्णाच्या अवयवदानामागे ५० हजार रुपये प्रोत्साहन निधी देणे विचाराधीन आहे. या संदर्भातील येत्या काळात ठोस निर्णय होणार असल्याचे समजते.



अवयवदात्याच्या कुटुंबाला पाच लाख रुपयांचा मदत निधी देणे केंद्राच्या विचाराधीन आहे व इतरही प्रोत्साहनपर निधी देण्याचा विचार सुरू आहे. याबाबत सर्व काही लवकरच स्पष्ट होईल आणि रुग्णहिताचा निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे.
– डॉ. सुधीर कुलकर्णी, अध्यक्ष, झेडटीसीसी

**मटा अँकर** 'झेडटीसीसी'ने दिले 'वैद्यकीय शिक्षण'ला पत्र; 'एनटीओआरसी'साठी नोंदणीचे आवाहन

# सरकारी रुग्णालयांनी पेलावे अवयवदानाचे आव्हान

Nikhil.Nirkhee
@timesgroup.com
Tweet : @nnirkheeMT

**औरंगाबाद** : राज्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयांनी, सरकारी रुग्णालयांनी; तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांनी अवयवदानासाठी पुढे यावे, रुग्णालयांमध्ये अवयवदान करून घेण्यासाठी 'नॉन ट्रान्स्प्लान्ट ऑर्गन रिट्रायव्हल सेंटर'साठी (एनटीओआरसी) नोंदणी करावी, असे आवाहनाचे पत्र 'झेडटीसीसी'ने नुकतेच वैद्यकीय शिक्षण विभागाला दिले आहे. सर्वाधिक प्रमाणात रुग्ण उपचारासाठी येणाऱ्या सर्व प्रकारच्या सरकारी रुग्णालयांमध्ये 'रिट्रायव्हल सेंटर' सुरू झाले तर प्रत्यारोपणाची संख्या व दर्जा वाढून रुग्णांच्या हालअपेष्टा कमी होण्यास मदत होणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

### 'डोनर'ची सर्वांगीण काळजी गरजेची

'एनटीओआरसी'सह ज्या रुग्णालयात प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया होते, अशा रुग्णालयांनी अवयवदात्यांची (लाइव्ह डोनर) जन्मभर काळजी, फॉलोअप घ्यावा आणि मुख्य म्हणजे प्रत्यारोपणानंतरची महत्त्वाची काळजी (पोस्ट-ऑपरेटिव्ह केअर) घ्यावी, ज्यामुळे अवयवदात्यांना भविष्यात कोणताच त्रास होणार नाही. याबाबतही 'झेडटीसीसी'ने पत्राद्वारे लक्ष वेधले आहे.



अवयवदानासंबंधी होणाऱ्या 'महाराष्ट्र को-फेडरेशन फॉर ऑर्गन ट्रान्स्प्लान्ट'च्या (मॅकफॉट) बैठकीमध्ये सरकारी रुग्णालयांनी अवयवदानासाठी पुढे येण्याचे आवाहन केले असून, वैद्यकीय शिक्षण सचिवांना पत्रही दिले आहे. रुग्णालयांनी ब्रेन डेड रुग्णांची माहिती कळवल्यास 'झेडटीसीसी' ही डॉक्टरांची टीमही मॅनेज करू शकते.
– डॉ. सुधीर कुलकर्णी, अध्यक्ष, झेडटीसीसी

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा सामान्य रुग्णालय आहे आणि बहुतांश जिल्हा रुग्णालयांमध्ये आयसीयू, शस्त्रक्रियागार, शस्त्रक्रिया होण्यासाठीच्या किमान पायाभूत सोयी-सुविधा आहेत. त्यामुळे अशा प्रत्येक रुग्णालयामध्ये अवयवदानाच्या म्हणजेच वेगवेगळे अवयव काढण्याच्या शस्त्रक्रिया सहजपणे होऊ शकतात. त्यातच प्रत्येक जिल्हा रुग्णालयामध्ये अत्यावस्थ सर्व प्रकारच्या उपचारांसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्याही फार मोठी आहे. यातील 'ब्रेन डेड' रुग्णांचे अवयवदान होऊ शकते, परंतु राज्यातील एकाही जिल्हा रुग्णालयात अवयवदान झालेले नाही. त्याचवेळी मोजून तीन ते चार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्येच आतापर्यंत अवयवदान झाले आहे. यामध्ये सर्वात पहिल्यांदा औरंगाबादच्या घाटीत, नंतर नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात व नुकतेच मुंबईतील जे. जे. रुग्णालयात अवयवदान झाले. अर्थातच, जे काही अवयवदान झाले तेदेखील अतिशय अल्पप्रमाणात झाले आहे. तब्बल डझनभर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अजून एकदाही अवयवदान झालेले नाही. उल्लेखनीय बाब म्हणजे प्रत्येक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रत्येक महिन्याला वेगवेगळ्या आजारातून ब्रेन डेड होणाऱ्या रुग्णांची संख्याही पाच-दहापेक्षा जास्तच आहे. त्यामुळेच अशा सगळ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी व जिल्हा रुग्णालयांनी अवयवदानासाठी पुढे यावे आणि 'एनटीओआरसी'साठी नोंदणी करावी. त्यानंतर संबंधित समितीकडून पाहणी होऊन निकषांच्या आधारे अवयवदानासाठी मान्यता मिळू शकते आणि अवयवदानाची चळवळ जिल्हा, तालुका व ग्रामीण भागापर्यंत पोहचून अधिकाधिक रुग्णांना अधिकाधिक अवयव मिळू शकतील, असेही मत 'झोनल ट्रान्स्प्लान्ट को-ऑर्डिनेशन कमिटी'चे अध्यक्ष डॉ. सुधीर कुलकर्णी यांनी 'मटा'कडे नोंदविले.

## Brain-dead woman's organs donated at MGM

Lokmat Times

## शहरात आज प्रथमच महिलेचे अवयवदान

सकाळ

## ब्रेन डेड महिलेचे होणार अवयवदान

लोकमत

# एमजीएममध्ये लिव्हर ट्रान्स्प्लान्ट यशस्वी

**औरंगाबाद** : मृत्युशी पाच वर्षांपासून झुंज सुरू होती. मागच्या तीन महिन्यांत यकृत प्रत्यारोपणाशिवाय पर्याय नसल्याचे डॉक्टरांनी सांगून टाकले होते. यकृताचा शोध देशभर सुरू होता आणि शुक्रवारी सायंकाळी साडेपाचला फोन आल्यानंतर संध्याकाळी सात वाजता सुरतहून निघालो आणि मध्यरात्री दोन वाजता औरंगाबाद गाठले. रात्रभर चाचण्या होऊन शनिवारी सकाळी आठ ते रात्री नऊ पर्यंत शस्त्रक्रिया चालली आणि यशस्वी झाली ती दात्यामुळे व 'एमजीएम'मुळेच, अशी भावना आहे, प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झालेल्या महिलेच्या पतीची. तर, प्रत्यारोपणामुळेच आता मी चालू-फिरू शकते, मनसोक्त खाऊ शकते, अशी भावना आहे महिलेची.

### 'फॅटी लिव्हर'मुळेच यकृत निकामी

स्थुलत्वामुळेच 'फॅटी लिव्हर'चा प्रश्न गंभीर बनत असून, 'फॅटी लिव्हर'मुळेच संबंधित महिलेचे यकृत निकामी झाले होते. त्यामुळेच आपल्या मुलांनेही 'फॅटी लिव्हर'पासून स्वत:चा बचाव करावा, अशी भावना महिलेने व्हिडिओत व्यक्त केली. दरम्यान, यकृत प्रत्यारोपणासाठी मुंबई-पुण्यात २०-३५ लाखांचा खर्च येतो; पण 'एमजीएम'मध्ये १०-११ लाखांत प्रत्यारोपणाचा प्रयत्न असेल, असेही डॉ. सूर्यवंशी म्हणाले.

शहरामध्ये शनिवारी अवयवदान झाले आणि याच अवयवदानातून मराठवाड्यातील पहिले यकृत प्रत्यारोपण एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये उपअधिष्ठाता डॉ. प्रवीण सूर्यवंशी व त्यांच्या टीमने यशस्वी केले. दात्याचा रक्तगट बी पॉझिटिव्ह होता व योगायोगाने यकृताच्या प्रतीक्षेतील सुरतमधील ५९ वर्षांच्या महिलेचा रक्तगटही तोच आहे. महिलेचे कुटुंबीय प्रत्यारोपणासाठी तातडीने तयार झाले. प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया १३ तास चालली आणि डॉ. सूर्यवंशी व टीमने यशस्वी केली.

डॉ. सूर्यवंशी म्हणाले, यकृत प्रत्यारोपण ही जगातील सर्वांत अवघड व क्लिष्ट शस्त्रक्रिया आहे. प्रत्येकाच्या यकृताची रचना हमखास वेगवेगळी असते व त्यातही 'कॅडेव्हर ट्रान्स्प्लान्ट'मध्ये दात्याच्या यकृताचा कोणताही पूर्व अभ्यास शस्त्रक्रियेपूर्वी करता येत नसल्यामुळे अशी शस्त्रक्रिया आणखीच कठीण असते. शस्त्रक्रियेवेळीच दात्याच्या यकृताची नेमकी रचना स्पष्ट होते व त्यानंतरच प्रत्यारोपणासाठी तीन-चार 'ट्रान्स्प्लान्ट सर्जन'ना मोठी लढाई लढावी लागते. याच स्थितीमुळे प्रत्येकवेळी 'कॅडेव्हर ट्रान्स्प्लान्ट'द्वारे यकृताचे प्रत्यारोपण यशस्वी होईल, असे निश्चितपणे सांगता येत नाही. सुदैवाने महिलेमध्ये 'टेक्स्टबुक रिकव्हरी' दिसून आली. अवघ्या १२ तासांत व्हेंटिलेटर काढणे शक्य होऊन ४८ तासांत ती खाऊ शकते आहे.'

# अवयवांची प्रतीक्षा संपता संपेना

## मराठवाड्यातील ३२१ रुग्ण मृत्युच्या दाढेत; 'रिट्रायव्हल सेंटर'ची संख्याही वाढत नसल्याचे चित्र




म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

### ग्रामीण भागातून कधी होणार अवयवदान?

बहुतांश जिल्हा रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या खूप मोठी आहे. यामध्ये अत्यवस्थ व ब्रेन डेड रुग्णांची संख्याहगी लक्षणीय असते. त्यामुळे या रुग्णालयातील ब्रेन डेड रुग्णांकडून मोठ्या प्रमाणावर अवयवदान होऊ शकते आणि म्हणूनच निदान प्रत्येक जिल्हा रुग्णालयामध्ये, मोठ्या तालुका रुग्णालयांमध्ये किंवा इतर शासकीय रुग्णालयांमध्ये रिट्रायव्हल सेंटर सुरू करावे व या केंद्रांमधून अधिकाधिक ब्रेन डेड दात्यांचे अवयवदान होऊन अवयवांच्या प्रतिक्षेत असलेल्या रुग्णांना नवीन आयुष्य मिळावे, असे आवाहन करणारे लेखी पत्र औरंगाबाद झेडटीसीसीकडून मागच्या वर्षी सार्वजनिक आरोग्य विभागासह वैद्यकीय शिक्षण विभागाला देण्यात आले होते. मात्र त्यानंतरही मराठवाडा विभागातील एकाही जिल्हा किंवा तालुका किंवा ग्रामीण रुग्णालयामध्ये रिट्रायव्हल सेंटर सुरू झालेले नाही किंवा तसे प्रयत्नदेखील झालेले नाहीत. केवळ मराठवाडा विभागात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील बहुतांश जिल्हा रुग्णालयांमध्ये रिट्रायव्हल सेंटर कार्यरत झालेले नाही. या पार्श्वभूमीवर जिल्हा पातळीवर रिट्रायव्हल सेंटर नसेल तर ग्रामीण भागातून अवयवदान होणार तरी कसे आणि केव्हा, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्याचवेळी ग्रामीण भागातील नागरिकांना अवयवदान करण्याची इछा असेल आणि तशी संधी मिळाली तरी रिट्रायव्हल सेंटर नसल्यामुळे अवयवदान होऊ शकणार नाही, या वस्तुस्थितीकडे कधी लक्ष दिले जाणार आहे की नाही, याकडेही तज्ज्ञांकडून लक्ष वेधले जात आहे.

अवयवदान निःसंशय वाढले पाहिजे आणि प्रत्येक समाजातून ते वाढले पाहिजे. मात्र त्याचवेळी अवयवदान वाढवण्यासाठी गरजेची रिट्रायव्हल सेंटरदेखील वाढली पाहिजेत. मुख्य म्हणजे ग्रामीण भागांमध्येही रिट्रायव्हल सेंटर सज्ज झाली पाहिजेत, त्याशिवाय ग्रामीण भागातून अवयवदान वाढण्याची शक्यता कमीच आहे.
– डॉ. सुधीर कुलकर्णी, झेडटीसीसी अध्यक्ष

१५ जानेवारी २०१६ रोजी मराठवाडा व खान्देशातील पहिले ऐतिहासिक अवयवदान औरंगाबाद शहरात झाले आणि तेव्हापासून आतापर्यंत पावणेतीन वर्षांमध्ये २१ ब्रेन डेड दात्यांकडून ६७ अवयवांचे दान झाले आणि यातील ४२ अवयवांचे प्रत्यारोपण औरंगाबाद शहरात, तर २५ अवयवांचे प्रत्यारोपण शहरवगळता राज्यात व परराज्यात झाले. अर्थातच, तब्बल ६७ रुग्णांना जीवनदान मिळाले व त्यांच्या वाट्याला नवीन आयुष्य आले. दरम्यान, अवयवदानाचा प्रचार-प्रसार मोठ्या प्रमाणावर होत असला तरी आणि आता तर चक्क ज्येष्ठांनी अवयवदानाच्या जनजागृतीसाठी मराठवाड्यात पदयात्रा सुरू केली असली तरी मराठवाड्यातील तब्बल ३२१ रुग्ण विविध अवयवांच्या प्रतीक्षेत आहेत म्हणजेच मृत्युच्या दाढेत आहेत.

अवयवदानाचा श्रीगणेशा होऊन पावणे तीन वर्षे लोटली आहेत आणि ग्रामीण भागापर्यंत आणि अगदी खेड्यापाड्यातील ग्रामस्थांपर्यंतही अवयवदानाची माहिती पोहोचली आहे. त्यामुळेच कदाचित या कालावधीमध्ये २१ ब्रेन डेड दात्यांकडून विविध अवयवांचे दान झाले. विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समितीचे (झेडटीसीसी) समन्वयक मनोज गाडेकर यांच्यानुसार, २१ दात्यांकडून ३९ मूत्रपिंड, १९ यकृत, ९ हृदयांचे तसेच २५ नेत्रांचे दान करण्यातच आले. यातील ४२ अवयवांचे औरंगाबाद शहरात, तर २५ अवयवांचे प्रत्यारोपण शहराबाहेर झाले. यातील दोन हृदयांचे चेन्नईतील रुग्णालयामध्ये प्रत्यारोपण झाले. ही बाब नक्कीच सकारात्मक असली तरी अवयवदानाची गरज आणि प्रत्यक्षात होणारे अवयवदान यामध्ये खूप मोठे अंतर आहे. त्यामुळेच आणखी मोठ्या प्रमाणावर अवयवदान होण्याची फार मोठी गरज तज्ज्ञांकडून व्यक्त होत असतानाच, ज्या रुग्णालयांमध्ये केवळ अवयवदान होते असे 'रिट्रायव्हल सेंटर' संपूर्ण मराठवाड्यात वाढण्याची गरज व्यक्त होत आहे. सद्यस्थितीत संपूर्ण मराठवाड्यात केवळ सहा प्रत्यारोपण केंद्र (ट्रान्स्प्लान्ट सेंटर) व केवळ पाच रिट्रायव्हल सेंटर (ब्रेन डेड रुग्णाचे अवयव काढण्याची शस्त्रक्रिया होऊ शकणारी केंद्रे) आहेत. अर्थात, ही संख्या खूपच धिम्या गतीने वाढत असल्याची दुर्दैवी स्थिती आहे. औरंगाबाद, नांदेड, लातूर व अंबेजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालये, तसेच औरंगाबाद शहरातील एमआयटी हॉस्पिटल हीच ती रिट्रायव्हल सेंटर आहेत. आणखी दोन रुग्णालये 'पाईपलाईन'मध्ये असल्याचे समजते. मात्र ही दोन्ही रुग्णालये गृहीत धरूनदेखील काही कोटींची लोकसंख्या असलेल्या संपूर्ण विभागामध्ये प्रत्यारोपण केंद्रांची संख्या तुलनेने नगण्य अशीच मानली जात आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एकाही रुग्णालयामध्ये प्रत्यारोपण केंद्र सुरू झालेले नाही, असेही यानिमित्ताने समोर येत आहे.

# १५ वर्षांच्या मुलाकडून चौघांना जीवनदान

## दोघांना मिळणार दृष्टीदान; १५ वर्षांचा मुलगा ठरला सर्वांत कमी वयाचा अवयवदाता

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

महापालिकेच्या सफाई कामगाराच्या १५ वर्षीय मुलाने अत्युच्च अवयवदानाचा इतिहास रचत चौघांना जीवनदान, तर दोघांना दृष्टीदान दिले. विशेष म्हणजे शहरात २४ तासांत दोन ब्रेन डेड व्यक्तींकडून अवयवदान झाले आणि तब्बल ७ व्यक्तींना जीवनदान मिळाले. हादेखील शहरात एक निराळा इतिहास रचला गेला. त्याचबरोबर 'एमजीएम'मध्ये शुक्रवारी (२२ जून) झालेल्या अवयवदानात १५ वर्षीय अवयवदाता हा सर्वांत कमी वयाचा दाता ठरला आहे. या किशोरवयीन दात्याच्या दोन मूत्रपिंडाचे प्रत्यारोपण शहरात, तर हृदयाचे मुंबईत व यकृताचे नागपूरला प्रत्यारोपण शुक्रवारी उशिरापर्यंत सुरू होते.

मिसारवाडीत राहणाऱ्या १५ वर्षीय मुलाचा १९ जून रोजी शहरातील दूध डेअरी चौकात अपघात झाला होता. त्यानंतर त्याला एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान तो गुरुवारी (२१) ब्रेन डेड झाला आणि अवयवदानाला नकार दिलेल्या त्याच्या पालकांनी नंतर फार मोठ्या मनाने अवयवदानाचा धीरोदात्त निर्णय घेतला. त्यानंतर सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होऊन व देशभरातील प्रतीक्षा यादीची छाननी होऊन 'एमजीएम'मध्ये एका, कमलनयन बजाज रुग्णालयामध्ये दुसऱ्या किडनीचे, तर हृदय हे मुंबईतील फोर्टिस हॉस्पिटल व यकृत हे नागपूर येथील न्यू एरा हॉस्पिटलमध्ये प्रत्यारोपण करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि शुक्रवारी सायंकाळपर्यंत प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया सुरू होत्या. हृदय व यकृत नेण्यासाठी खास 'चार्टर प्लेन'ची व्यवस्था केली होती व दुपारी अडीचच्या सुमारास विमानाने हृदय व यकृत पाठवण्यात आले.

मुंबईहून नागपूरला यकृत नेण्यासाठी आणखी एका विमानाची सोय करण्यात आली होती. तसेच दोन्ही कॉर्निया हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या नेत्रपेढीला देण्यात आले. यातील एका किडनीचे प्रत्यारोपण हे हिंगोलीच्या ३५ वर्षीय पुरुष रुग्णावर, तर दुसऱ्या किडनीचे प्रत्यारोपण हे चाळीशीतील महिला रुग्णावर करण्यात आले. फुफ्फुस हे अवयवदानासाठी योग्य नव्हते म्हणून फुफ्फुलाचे अवयवदान टाळण्यात आल्याचे 'झेडटीसीसी'चे अध्यक्ष डॉ. सुधीर कुलकर्णी, 'एमजीएम'चे उपअधिष्ठाता व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

अवयवदानासाठी 'एमजीएम'चे डॉ. इश्तियाक अन्सारी, डॉ. राहूल चौधरी, डॉ. संदीप जावळे, मनोज गाडेकर आदींच्या टीमने प्रत्यारोपणासाठी पुढाकार घेतला.



अवयवदान शस्त्रक्रिया यशस्वी करणारी एमजीएमची टीम.

एकमेव निष्पक्ष वृत्तपत्र

महाराष्ट्र टाइम्स

### दात्याच्या कुटुंबाला मिळणार ५ लाख

प्रत्येक अवयवदात्याच्या कुटुंबियांना पाच लाख रुपये (दरवर्षी एक लाख रुपये) देण्याचा निर्णय केंद्र सरकारच्या विचाराधीन आहे. त्यासाठीची अधिसूचना केंद्र सरकारने गुरुवारी (२१ जून) काढली असून, या संदर्भात अधिकाधिक सूचना करण्याचे आवाहन 'झेडटीसीसी'सह अवयवदानाशी संबंधित व्यक्ती, संस्थांना केले आहे. त्यामुळे कुटुंबियांना पाच लाख रुपयांचे मानधन मिळण्याची सुचिन्हे असून, कुटुंबातील एका सदस्याला सरकारी नोकरी किंवा इतर लाभ देण्याचाही विचार सुरू असल्याचे डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले. त्याचबरोबर यंदाच्या १८ व्या अवयवदानापासून अवयवदानाअगोदर पंचनामा करण्याचा प्रघात पाडण्यात आला असून, शवविच्छेदनदेखील अवयवदानाच्या शस्त्रक्रियेनंतर होऊ शकेल का, याचाही प्रत्यन सुरू असकल्याचे ते म्हणाले.

### दाता होता चुणचुणीत, हुशार


आपल्या सहा अवयवांचे दान करणारा सफाईकामगाराचा मुलगा हा संत तुकाराम हायस्कूलमदध्ये इयत्ता आठवीमध्ये शिकत होता व अतिशय हुशार, चुणचुणीत होता. त्याशिवाय अत्यंत मनमिळावू तसेच कष्टाळू होता, असेही त्याच्या नातेवाईकांनी सांगितले. त्याच्या दुर्दैवी मृत्युमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली.

---

# मुंबईच्या रुग्णावर यकृत प्रत्यारोपण

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

'नागपूर येथे ब्रेनडेड घोषित केलेल्या मुंबईतील रुग्णाला शहरातील एमजीएम रुग्णालयात यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. यकृत प्रत्यारोपण करण्याची ही मराठवाड्यातील दुसरी घटना आहे. तीन महिन्यांच्या कालावधीनंतर दुसऱ्यांदा एमजीएममध्ये यकृत प्रत्यारोपण करण्यात येत आहे,' अशी माहिती रुग्णालयाचे उपअधिष्ठाता डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी शनिवारी पत्रकारांना दिली.



डॉ. सूर्यवंशी म्हणाले, 'नागपूर येथील ५२ वर्षीय रुग्णांच्या मेंदूत रक्तस्राव झाल्यानंतर डॉक्टरांनी त्यास शुक्रवारी ब्रेनडेड घोषित केले. त्यांच्या नातेवाईकांनी अवयवदानाची इच्छा व्यक्त केली. त्यानंतर प्रत्यारोपण समितीने रुग्णाची चाचणी व गरजूंची यादी तपासून मूत्रपिंड (किडनी) नागपूर येथील रुग्णासाठी, हृदय चेन्नईतील फोर्टिस हॉस्पिटल तर यकृत एमजीएम रुग्णालयात पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. मुंबईतील ६९ वर्षीय रुग्णाला यकृताची गरज होती. प्रत्यारोपणासंदर्भातील संपूर्ण चाचण्या पूर्ण झाल्यानंतर या रुग्णावर यकृत प्रत्यारोपणाचा निर्णय घेण्यात आला. ग्लोबल हॉस्पिटल, मुंबई येथील डॉक्टरांच्या टिमने नागपूर येथून चॉर्टर विमानाने औरंगाबादेत शनिवारी सायंकाळी सहाच्या सुमारास यकृत आणले. विमानतळापासून हॉस्पिटलपर्यंत ग्रीन कॉरिडॉर लावण्यात आले.'

### पाच तास विलंब

नागपूरहून औरंगाबादेत यकृत येण्यापूर्वी डॉ. प्रवीण सूर्यवंशी व त्यांच्या टिमने मुंबईतील रुग्णाचे यकृत काढले होते. यकृत येताच डॉ. सूर्यवंशी यांच्यासह डॉ. रवी मोहका, डॉ. प्रशांत राव, डॉ. नारायण सानप, डॉ. अमोल, डॉ. नागेश जंबुरे यांनी प्रत्यारोपणासाठी सहकार्य केले. रात्री उशिरापर्यंत प्रत्यारोपण सुरूच होते. मुंबईत चार्टर फ्लाइट वेळेवर मिळाले नाही, त्यामुळे दिल्लीहून चार्टर फ्लाइट मागविण्यात आले. त्यामुळे आठ लाखांचा खर्च अधिक आला आणि प्रत्यारोपणासाठी पाच तास विलंब झाला.

---

# ज्येष्ठांच्या पदयात्रेला उत्साहात प्रारंभ

### मराठवाड्यात होणार अवयवदानाचा जागर

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

अवयवदानाच्या सर्वांगीण जनजागृतीसाठी स्थापन झालेल्या 'द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन'च्या वतीने अवयवदान प्रत्येकाच्या मनामनामध्ये बिंबवण्यासाठीच ज्येष्ठ नागरिक सज्ज झाले असून, याच हेतुने ज्येष्ठांच्या औरंगाबाद ते तुळजापूर या ३९ दिवसांच्या पदयात्रेला शुक्रवारी (१६ नोव्हेंबर) प्रारंभ झाला. ही पदयात्रा संपूर्ण मराठवाड्यात काढण्यात येणार आहे आणि यानिमित्ताने गावोगावी सभा, कार्यशाळा, पथनाट्याच्या माध्यमातून अवयवदानाचे महत्त्व व गरज पटवून देण्यात येणार आहे.

विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समिती (झेडटीसीसी) तसेच महात्मा गांधी मिशन ट्रस्टच्या सहकार्यातून आणि 'द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन'च्या वतीने आयोजित मराठवाडा अवयवदान पदयात्रेचा शुभारंभ शुक्रवारी सकाळी साडेआठला एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील महात्मा गांधींच्या पुतळ्याला अभिवादन व पुष्पहार अर्पण करुन झाला. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. कालिदास चव्हाण, एमजीएमचे विश्वस्त अंकुशराव कदम, प्रतापराव बोराडे, झेडटीसीसीचे अध्यक्ष डॉ. सुधीर कुलकर्णी, समन्वयक मनोज गाडेकर, जयेश धवाले, फेडरेशनचे अध्यक्ष पुरुषोत्तम पवार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे उपअधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, शासकीय कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड, घाटीचे माजी वैद्यकीय अधीक्षक डॉ. भारत सोनवणे आदींच्या उपस्थितीत पदयात्रेला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. या वेळी एमजीएमचे नर्सिंग कॉलेज तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### सांगता होणार २४ डिसेंबरला

आतापर्यंत फेडरेशनतच्या वतीने नाशिक ते नागपूर ही १३४० किलोमिटर अंतराची ५३ दिवसांची पहिली पदयात्रा, तर संपूर्ण कोकण ते गोवा ही ८५० किलोमिटरची दुसरी पदयात्रा काढण्यात आली आहे. मराठवाड्यातील पदयात्रा ही फेडरेशनच्या पुढाकारातून होणारी तिसरी पदयात्रा आहे. या पदयात्रेमध्ये वसंत चिकोडे (७५, रा. नाशिक), प्रियदर्शन बापट (६०, रा. नाशिक), चंद्रशेखर वसंत देशपांडे (६७, रा. नवी मुंबई), शैलेश वसंत देशपांडे (६३, रा. नवी मुंबई), अविनाश कुलकर्णी (६४, नाशिक), सुनील देशपांडे (६३, रा. नाशिक), दयानंद मठपती (४४, रा. औरादशहाजनी) व दत्ता कुलकर्णी (नाशिक) हे सहभागी झाले आहेत. या पदयात्रेची सांगता २४ डिसेंबर रोजी होणे अपेक्षित आहे.

---

# कॅलेंडरचे प्रकाशन

औरंगाबाद : अवयवदात्यांच्या सन्मान तसेच स्मृतीप्रित्यर्थ शहरातील 'विभागीय प्रत्यारोपण समन्वय समिती'च्या (झेडटीसीसी) वतीने तयार करण्यात आलेल्या 'दि रिअल हिरोज' या कॅलेंडरचे प्रकाशन नुकतेच एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये झालेल्या 'झेडटीसीसी'च्या बैठकीत झाले. शहरामध्ये अवयवदान केलेल्या अर्चना श्रावक या अवयवदात्याचे बंधू निशांत कासलीवाल यांच्या हस्ते कॅलेंडरचे प्रकाशन झाले. याप्रसंगी 'झेडटीसीसी'चे अध्यक्ष डॉ. सुधीर कुलकर्णी, उपाध्यक्ष डॉ. अजित दामले, सहसचिव डॉ. प्रवीण सूर्यवंशी, डॉ. प्रभाकर जिरवणकर, डॉ. अलोक श्रीवास्तव आदींची उपस्थिती होती.

# किडनीप्राप्त तरुणाची माणुसकीची हाक

मटा विशेष






कृषी प्रदर्शनात उपलब्ध करण्यात आलेल्या स्टॉलला खासदार चंद्रकांत खैरे यांनी पाहणी केली.

# हजारोंपर्यंत अवयवदान, देहदानाचा संदेश

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

शहरात नुकत्याच झालेल्या तीन दिवसीय कृषी प्रदर्शनामध्ये अवयवदान, नेत्रदान, देहदानाबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी खास स्टॉल उपलब्ध करण्यात आला होता आणि चक्क १० ते १२ हजार व्यक्तींपर्यंत अवयवदान, देहदान, नेत्रदानाचा संदेश पोहोचवण्यात आला. विशेष म्हणजे या स्टॉलला सर्व क्षेत्रातील सर्वस्तरीय मान्यवरांपासून लोकप्रतिनिधींपर्यंत अनेकांनी या स्टॉलला भेट देऊन अवयवदान, देहदान, नेत्रदानाविषयी जाणून घेतले.

'औरंगाबाद युथ सोशल वेलफेअर फाऊंडेशन' तसेच 'विभागीय प्रत्यारोपण समन्वय समिती'च्या (झेडटीसीसी) वतीने हा स्टॉल प्रदर्शनात उपलब्ध करण्यात आला होता. प्रदर्शनाला भेट दिलेल्या अनेकांनी या स्टॉलला भेट देऊन अवयवदानाविषयी जाणून घेतले. या निमित्ताने स्टॉलला भेट देणाऱ्यांना अवयवदान, नेत्रदान व देहदानाची सविस्तर माहिती देण्यात आली व तब्बल १० ते १२ हजार व्यक्तींना अवयवदानाविषयीची माहितीपत्रके देण्यात आली. तसेच अवयवदानास इच्छुक असलेल्या दोनशे ते अडीचशे व्यक्तींना अवयवदानाचे फॉर्मही वाटण्यात आले. त्यापैकी सुमारे १५० इच्छुकांनी याच प्रदर्शनामध्ये अवयवदानाचे फॉर्मदेखील भरुन आणून दिले. त्याशिवाय सुमारे ७० व्यक्तींनी देहदानाचे फॉर्म भरुन दिले. याच प्रदर्शनानिमित्त 'झेडटीसीसी'च्या वतीने तयार करण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे तसेच काही 'डोनर कार्ड'चेही वाटप करण्यात आले.

### टीमकडून जनजागृतीचे कार्य

औरंगाबाद युथ सोशल वेलफेअर फाऊंडेशनचे सूर्यवंशी यांच्यासह प्रा. रविंद्र जिगे पाटील, डॉ. मंगेश मोरे, प्रा. चंपालाल कहारे, प्रसाद बोर्डे यांच्यासह 'झेडटीसीसी'चे जयेश धवाले, मनोज गाडेकर आदींच्या 'टीम'ने प्रदर्शनात अवयवदानाविषयी जनजागृतीचे काम केले.

### फॉर्मसाठी होणार पाठपुरावा

अवयवदानाच्या फॉर्मवर नातेवाईकांच्या सह्या आवश्यक असल्याने तात्काळ फॉर्म भरणे अनेकदा शक्य होत नाही. त्यामुळे फॉर्म नेले जातात; परंतु कुठल्या ना कुठल्या कारणाने फॉर्म भरुन देणे लांबते किंवा अनेकदा राहूनदेखील जाते. त्यामुळेच प्रदर्शनाच्या ठिकाणच्या स्टॉलवरुन फॉर्मचे वाटप करण्यात आलेल्या व्यक्तींचे पत्ते घेण्यात आले आले असून, लवकरच त्यांच्याकडून फॉर्म भरुन घेण्यासाठी पाठपुरावा केला जाणार आहे व जमा झालेले फॉर्म 'झेडटीसीसी'कडे सुपूर्द केले जाणार असल्याचे उद्योजक व फाऊंडेशनचे राजेशसिंह सूर्यवंशी यांनी 'मटा'ला सांगितले.

**मटा अँकर** मराठवाड्याच्या दोनच जिल्ह्यात अवयवदान; सहा जिल्ह्यांत रिट्रॅव्हल सेंटर नाहीत

# ब्रेन डेड पेशंट ५०; ट्रान्स्प्लान्ट मात्र एखादेच

Nikhil.Nirkhee
@timesgroup.com
Tweet : @nnirkheeMT

**औरंगाबाद :** शहरामध्ये १९ महिन्यांमध्ये १३ ब्रेन डेड रुग्णांकडून अवयवदान झाल्याबाबत कौतुक होत असले तरी मराठवाड्याच्या आठ जिल्ह्यांतील केवळ दोन जिल्ह्यातच आतापर्यंत अवयवदान झाले असून, तब्बल सहा जिल्ह्यांत एकही अवयवदान झालेले नाही आणि अवयवदानासाठी आवश्यक 'नॉन-ट्रान्स्प्लान्ट ऑर्गन रिट्रॅव्हल सेंटर'देखील (एनटीओआरसी) एकही नसल्याची वस्तुस्थिती आहे. एकट्या औरंगाबाद शहरात महिन्याभरात ब्रेन डेड होणाऱ्यांची संख्या किमान १० ते १५, तर संपूर्ण मराठवाड्यात ब्रेन डेड होणाऱ्यांची संख्या किमान ५० आहे. या पार्श्वभूमीवर अवयवदानाचे प्रमाण महिन्याला एकसुद्धा नसल्याचे स्पष्ट झाल्याशिवाय राहात नाही.

औरंगाबादेत १५ जानेवारी २०१६ रोजी मराठवाड्यातील पहिले अवयवदान झाले. त्यानंतरच्या झपाट्याने अवयदान झाले; परंतु सहा महिन्यांत अवयवदान मंदावले व साडेतीन महिन्यांनी १५ ऑगस्ट रोजी १३ वे अवयवदान झाले. आतापर्यंत हृदयासह सुमारे ५० अवयवांचे दान झाले असले तरी ते केवळ औरंगाबाद व नांदेड जिल्ह्यातच झाले आहे. इतर सहा जिल्ह्यांमध्ये एकही अवयवदान झालेले नाही. अवयवदानासाठी आवश्यक असलेले 'एनटीओआरसी' केंद्रदेखील या सहा जिल्ह्यांत नसल्याची वस्तुस्थिती आहे. धक्कादायक बाब म्हणजेच राज्य सरकारकडून अवयवदानाचा प्रचार-प्रसार जोशात केला जात आहे; परंतु मराठवाड्यातील केवळ दोनच शासकीय रुग्णालयांना रिट्रॅव्हल सेंटरची मान्यता आहे. अवयवदानाची चळवळ पुढे नेण्यासाठी सर्व जिल्हा सामान्य रुग्णालये व मोठी-मध्यम खासगी रुग्णालये रिट्रॅव्हल सेंटर व्हावीत, असे आवाहन औरंगाबाद 'झेडटीसीसी'ने वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांना लेखी पत्राद्वारे केले होते, मात्र पुढे काहीही झालेले नाही.

### सेंटरअभावी लातूरची संधी हुकली

अलीकडे लातूरच्या खासगी रुग्णालयात ब्रेन डेड रुग्णाच्या नातेवाईकांनी अवयवदानाचा निर्णय घेतला होता. मात्र संबंधित रुग्णालय रिट्राव्हल सेंटर नसल्याने अवयवदान होऊ शकले नाही. 'झेडटीसीसी'मार्फत अवयवदानाची शस्त्रक्रिया होऊ शकते; परंतु रिट्राव्हल सेंटरशिवाय शस्त्रक्रिया होऊ शकत नाही, असे 'झेडटीसीसी'चे अध्यक्ष डॉ. सुधीर कुलकर्णी यांनी 'मटा'ला सांगितले.

**मराठवाड्यात महिन्याला ब्रेन डेड होणाऱ्या रुग्णांची संख्या नक्कीच पन्नासच्या पुढे आहे व त्यांचे अवयवदान झाले तर शेकडो लोकांना जीवनदान-दृष्टिदान मिळेल. त्यामुळे रिट्राव्हल सेंटरसाठी रुग्णालयांनी पुढे आले पाहिजे.**
- डॉ. मिलिंद दुनाखे, न्युरोसर्जन, औरंगाबाद

**मराठवाड्यातील ब्रेन डेड रुग्णांची महिन्याभरातील संख्या हमखास पन्नासच्या पुढे असली तरी गैरसमज व मानसिकतेचा मोठा अडसर अवयवदानात आहे. हे अडथळे पार केल्याशिवाय अवयवदान वाढणे शक्य वाटत नाही.**
- डॉ. भावना टाकळकर, न्युरोसर्जन, औरंगाबाद

**'रिट्राव्हल सेंटर'सह डॉक्टरांमध्ये अवयवदानाविषयी जनजागृती वाढण्यासाठीच प्रत्येक जिल्ह्यात कार्यशाळा घेण्यात येणार आहे. त्यासाठी 'नोटो'तर्फे निधी दिला जाणार आहे. समन्वयकही दिले जातील. त्यामुळे काही वर्षांत अवयवदानाचे प्रमाण उल्लेखनीरित्या वाढेल.**
- डॉ. अविनाश सुपे, सल्लागार समिती अध्यक्ष, रोटो, मुंबई

# महिलेचे तिघांना जीवनदान; दोघांना दृष्टी

मराठवाड्यातील १३ वे अवयवदान यशस्वी; यकृताचे मुंबईत, दोन्ही किडनी व कॉर्नियाचे औरंगाबादेत प्रत्यारोपण


















# महिलेच्या अवयवदानाने तिघांना जीवदान, तर एकास दृष्टी

# वैद्यकीय क्षेत्रामुळे औरंगाबादचे नाव उंचावले, दुसऱ्यांदा अवयवदानासह प्रत्यारोपण यशस्वी

बुलडाण्याच्या सुनील बुधवंतच्या नातेवाइकांकडून अवयवदानाचा निर्णय



31 08

दै. लोकसत्ता ३१/१/२०१६

# जीव वाचविण्यासाठी धावून येणार आणखी एक राम...

पुण्याला यकृत, औरंगाबादेत होणार किडनीचे प्रत्यारोपण

# TODAY

## औरंगाबादेतून दुसऱ्यांदा हृदयाचा प्रवास



चेन्नईला हृदयाचे प्रत्यारोपण, रामभाऊंमुळे चौघांना मिळाले जीवदान

दै. सकाळ २२/२/२०१६

# 'ब्रेन डेथ रिपोर्टिंग' हॉस्पिटलकडून बंदच

म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद

तीन महिन्यांपासून रुग्णालयांमधून एकही रिपोर्ट नाही

## पन्नास अवयवांचे दान



एकाही रुग्णालयाकडून तीन महिन्यांत 'ब्रेन डेथ रिपोर्टिंग' झाले नाही, जे निराशाजनक आहे. डॉक्टरांनी संबंधित रुग्ण 'ब्रेन डेड' असल्याचे सांगितले नाही तर अवयवदान होणार तरी कसे?



– डॉ. सुधीर कुलकर्णी, झेडटीसीसी अध्यक्ष

# एमजीएम रुग्णालयात अवयवदानाच्या हालचाली

दिव्य मराठी (०१।०५।२०१६)

महाराष्ट्र टाइम्स (०१।०५।२०१६)

# महाराष्ट्रदिनी तरुणाचे एमजीएममध्ये अवयवदान

औरंगाबाद | रामनगरातील प्रवीण हनुमंतराव काकडे (२२) या तरुणाचे महाराष्ट्रदिनी एमजीएम रुग्णालयात अवयवदान घडले. मात्र, प्रकृतीने साथ न दिल्याने किडनी अन् हृदय दान होऊ शकले नाही मात्र यकृत पुणे येथे पाठवण्यात यश मिळाले. रक्ताची उलटी झाल्याने ४ दिवसांपूर्वी प्रवीणला एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. ३० एप्रिलच्या दुपारी तो ब्रेन डेड झाला. रुग्णालय प्रशासनाने नातलगांना कल्पना दिल्यानंतर चर्चा झाली. त्यांनी संमती दर्शवल्यानंतर प्रक्रिया सुरू झाली. उपचारादरम्यान हृदयाची स्थिती ठीकनसल्याचे निदर्शनास आले, तर किडनी स्टोनची शस्त्रक्रिया झालेली असल्याने किडनीदानही शक्य नव्हते. नगरातील रुग्णाला यकृत दान करण्याचे ठरले. मात्र, हवाई वाहतूक उपलब्ध न झाल्याने यकृतदान होऊ शकते की नाही, असा पेच निर्माण झाला. मात्र, पुण्यात रुग्ण असल्याचे झेडटीसीसीला कळाले अन् रस्ते मार्गाने पुणे येथे यकृत पाठवण्याची व्यवस्था झाली.




३ वर्षांत हृदयाचे प्रत्यारोपण शक्य

31 08 2016


# आणखी चौघांना मिळणार जीवदान

अवयव दान-प्रत्यारोपणाची पुनरावृत्ती : हृदय मुंबईला, लिव्हर पुण्याला, औरंगाबादेतच किडन्या



31 08 2016


# चार जीवांसाठी ५१ तासांचे कष्ट

२१व्या मिनिटाला झेपावले विमान

थ्रिलिंग अनुभव

'हेलिकॉप्टर सर्व्हिस हवीच'

31 08 2016


# अवयवदान चळवळीचा राम आदर्श

31 08 2016


# मराठवाड्यातून प्रवास करून मुंबईत धडधडतेय हृदय!

औरंगाबादहून प्रथमच हृदयाचा प्रवास : अवघ्या सोळाव्या दिवशीच पुन्हा एकाचे अवयवदान

सविस्तर वृत्तांत टुडे मध्ये

31 08 2016


# झेडटीसीसीच्या अध्यक्षपदी डॉ. सुधीर कुलकर्णी

विविध

५ | शुक्रवार, दि. १६ नोव्हेंबर २०१८

सामना

## अवयवदान जनजागृतीसाठी सेवानिवृत्तांची पदयात्रा

संभाजीनगर : इच्छाशक्ती प्रबळ असल्यास वयाचा अडथळा येत नसतो. याची अनुभूती आज अवयवदान जनजागृती पदयात्रेसाठी शहरात आलेल्या १० सेवानिवृत्तांना भेटल्यानंतर आली. सेवेतून निवृत्त झालेल्या दहा जणांची टीम उद्या शुक्रवारपासून ४० दिवसांच्या पदयात्रेतून अवयवदानाविषयी जनजागृती करणार आहे. मुंबई येथील द फेडरेशन ऑफ ऑर्गन ॲण्ड बॉडी डोनेशन या संस्थेच्या वतीने पाच वर्षांपासून अवयवदानाविषयी जनजागृतीचे काम केले जात आहे. या अभियानात विविध पदांवरून सेवानिवृत्त झालेले ६० ते ७५ वर्ष वयाचे वृद्ध तरुण सहभागी झाले आहेत. यामध्ये दयानंद सठपती (४४), नौदलातील रिटायर्ड चट नॉट टायर्ड वसंत चिकोडे (७५), निवृत्त अभियंता प्रियदर्शन बापट (६०), निवृत्त अभियंता चंद्रशेखर देशपांडे (६७), टाटा पॉवरमधून निवृत्त झालेले अभियंता शैलेश देशपांडे (६३), अविनाश कुलकर्णी (६४), सुनील देशपांडे (६४)आदींचा समावेश आहे.



## यकृत प्रत्यारोपणाने पुणेकराला संजीवनी



औरंगाबादेतून दुसऱ्यांदा हृदयाचा प्रवास



31 08 2016

# आणखी चौघांना नवे आयुष्य

## ■ चोवीस तासांत दुसरे अवयवदान

औरंगाबाद / प्रतिनिधी

बदनापूरच्या लक्ष्मण भेंडे यांचे अवयवदान व प्रत्यारोपण यशस्वी झाल्यानंतर शुक्रवारी (दि.२२) पंधरावर्षीय मुलाच्या अवयवदानानंतर चौघांना जीवनदान तर गरजवंतांना दृष्टी मिळाली आहे. अवघ्या चोवीस तासांत औरंगाबादेत हे दुसरे अवयवदान झाले आहे. चोवीस तासांत सात जणांना जीवनदान मिळण्याची ही शहराच्या इतिहासातील पहिलीच घटना आहे.

२४ तास उलटत नाही तोच दुसऱ्या ब्रेनडेड रुग्णामुळे अनेकांचे खडतर जीवन सुखकर झाले आहे. प्रतीक बाबासाहेब वाहूळकर (१५, रा. मिसारवाडी) याचा १९ जूनला दूध डेअरी चौकात अपघात झाला होता. अपघातात प्रतीकच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यामुळे डॉक्टरांनी प्रयत्न करूनही उपयोग होत नव्हता. शेवटी २१ जूनला तो ब्रेनडेड असल्याचे डॉक्टरांनी नातेवाइकांना सांगितले. नातेवाइकांना विश्वासात घेऊन अवयवदानाची माहिती 'झेडटीसीसी'चे समन्वयक मनोज गाडेकर यांनी दिली. आई-वडिलांनी संमती दिल्यानंतर दुपारी १ वाजता पहिली तपासणी करण्यात आली. दुसऱ्या तपासणी केल्यानंतर विभागीय प्रत्यारोपण समितीने (झेडटीसीसी) पुढील सूत्रे हलवली. गरजवंतांचा शोध घेतल्यानंतर शुक्रवारी (दि.२२) अवयवदान प्रत्यारोपण प्रक्रिया राबविण्यात आली. प्रतीकची एक किडनी एमजीएम रुग्णालय, दुसरी कमलनयन बजाज हॉस्पिटल, हृदय मुंबईतील फोर्टिस हॉस्पिटल तर लिव्हर नागपूर येथील न्यू एरा हॉस्पिटलमध्ये तर डोळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, घाटी येथे पाठविण्यात आल्याचे 'एमजीएम'चे उपअधिष्ठाता डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी सांगितले.



प्रतीक वाहूळकर

### ...अन् विमानतळावर आले चार्टर

प्रतीकचे हृदय नागपूर येथील रुग्णाला देण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु हृदय नागपूरला पाठविणे अशक्य होते. औरंगाबादच्या विमानतळावर सकाळी ८ ते सायंकाळी ४ यावेळेत विमानांना उड्डाण घेण्यास या येण्यास बंदी आहे. या कारणाने हृदयदान होईल की नाही यासंदर्भात साशंकता होती. केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्यानंतर विमान प्राधिकरणाने अत्यावश्यक सेवा म्हणून विमान आणण्यास मान्यता दिली. त्यानुसार मुंबईहून सकाळी आठ वाजता चार्टर विमान आले. दुपारी २.३० वाजता हृदय आणि लिव्हर घेऊन मुंबईकडे रवाना झाले.



## मराठवाड्यात रुजतेय अवयवदानाची चळवळ

दोन वर्षांत पंधरा जणांचे अवयवदान | ४७ अवयवांचे प्रत्यारोपण



दोन वर्षांतील अवयव प्रत्यारोपण

हृदयाची सीमापार

वर्षभरात २१ किडनी प्रत्यारोपण

पुढारी

# प्रतीकच्या अवयवदानाने चार जणांना जीवनदान

## शहरात सलग दोन दिवसांत दोघांचे अवयवदान

औरंगाबाद : प्रतिनिधी

मिसारवाडी येथील पंधरा वर्षीय प्रतीक वाहूळकर या ब्रेनडेड झालेल्या मुलाचे एमजीएम रुग्णालयात अवयवदान करण्यात आले. त्याचे हृदय मुंबई, यकृत नागपूर तर दोन्ही किडन्यांचे औरंगाबादेत प्रत्यारोपण करण्यात आले. प्रतीकच्या अवयवदानामुळे चार जणांना जीवनदान मिळाले असल्याची माहिती एमजीएमचे उपअधिष्ठाता डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी दिली आहे.

मोटरसायकल अपघातात डोक्याला मार लागल्याने प्रतीक वाहूळकर या विद्यार्थ्याला १९ जून रोजी एमजीएम रुग्णालयात भरती करण्यात आले होते. उपचारांती २१ जून रोजी दुपारी २ वाजता डॉक्टरांनी त्याला ब्रेनडेड घोषित केले. यानंतर दुसरी चाचणी रात्री आठ केल्यानंतर ब्रेनडेडवर शिक्कामोर्तब करण्यात आले. डॉक्टरांनी नातेवाइकांना याची कल्पना देऊन अवयवदानाबाबत माहिती दिली. सुरुवातीला आई-वडिलांचा नातेवाइकांचा अवयवदानासाठी विरोध होता. मात्र, नंतर त्यांनी यास होकार दिला. यानंतर झेडटीसीसीने पुढील सूत्रे हलविली. एमजीएमच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी गुरुवारी रात्री ऑपरेशनला सुरुवात केली. शुक्रवारी हे ऑपरेशन पूर्ण झाले. प्रतीकचे हृदय मुंबईला फोर्टीस रुग्णालयात पाठविले. यकृत नागपूरला, तर एक किडनी एमजीएम रुग्णालयातील रुग्णावर प्रत्यारोपण करण्यात आली. दुसरी किडनी सिग्मा रुग्णालयात महिला रुग्णावर प्रत्यारोपण करण्यात आली. डोळ्यांचा कॉर्निया घाटी नेत्रविभागात पाठविण्यात आला.

### दोन वाजता तयार केला ग्रीन कॉरिडॉर

प्रतीकचे हृदय व यकृत नेण्यासाठी शासनाची विशेष परवानगी घेऊन चॅर्टर्ड प्लेनची व्यवस्था करण्यात आली होती. नागपूर येथील न्यू इरा रुग्णालयाचे पथकही यकृत नेण्यासाठी हजर झाले होते. यकृत व हृदय विमानतळावर पोहोचविण्यासाठी पोलिसांनी एमजीएम रुग्णालय ते विमानतळ ग्रीन कॉरिडॉर बनविला. यानंतर चॅर्टर्ड प्लेनने मुंबईसाठी उड्डाण केले. तेथे हृदय फोर्टिस रुग्णालयाकडे रवाना करण्यात आले, तर दुसऱ्या विमानाने नागपूरसाठी यकृत रवाना झाले. न्यू इरा रुग्णालयात यकृताचे प्रत्यारोपण करण्यात आले.

### दूध डेअरी चौकात झाला अपघात

इयत्ता आठवीत शिकणारा प्रतीक आपल्या दोन मित्रांसोबत जालना रोडने ट्रिपल सीट चालला असताना, दूध डेअरी चौकाजवळ अपघात झाला. यात प्रतीकच्या डोक्याला मार लागून तो बेशुद्धावस्थेत पडला, तर एका मित्राला फ्रॅक्चर, तर दुसऱ्याला किरकोळ मार लागला. प्रतीकला १९ जून रोजी सायंकाळी ४ वाजता एमजीएम रुग्णालयात दाखल केले होते.

My Aurangabad Edition
23 Jun, 2018 Page No. 3
Powered by : erelego.com

राम मगरचे किडनी आणि यकृतदान यशस्वी

# हाय... पण हृदय धडकले नाहीच

## ग्रीन कॉरिडॉर — सिग्मा हॉस्पिटल आणि औरंगाबाद पोलिसांच्या प्रयत्नांना यश



31 08 2016



# अंगणवाडी सेविकेच्या निर्णयाने तिघांना जीवदान

## बदनापूर येथील लक्ष्मण भोईटे यांचे अवयवदान

सकाळ वृत्तसेवा



लक्ष्मण भोईटे



### सिग्मा ते एमजीएम ग्रीन कॉरिडॉर

# अवयवदात्यांच्या कुटुंबीयांना मिळेल पाच वर्षे आर्थिक मदत, वैद्यकीय लाभ

- आरोग्य मंत्रालयाचा केंद्राकडे प्रस्ताव
- झेडटीसीसीकडून घेणार सूचना, अभिप्राय

सकाळ वृत्तसेवा

# तिघांना जीवदान

» पान १ वरून

भाऊ रमेश व गणेश यांचे समुपदेशन केले. त्यानंतर लक्ष्मण यांना बुधवारी सिग्मा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. त्यानंतर झेडटीसीसीने पहिली ॲप्निया व दुसरी ॲप्निया टेस्ट करून बुधवारी रात्री अकरा वाजता त्यांना अधिकृत ब्रेनडेड घोषित केले. त्यानंतर कागदोपत्री परवानग्या व अपघात प्रकरण असल्याने पोलिस एनओसी मिळाल्यानंतर गुरुवारी (ता. २१) सकाळी अवयव काढण्याची प्रक्रिया सुरू झाली. दीड वाजता एक किडनी ग्रीन कॉरिडॉर करून एमजीएम रुग्णालयात पाठवण्यात आली, तर एक किडनी व यकृत प्रत्यारोपण सिग्मा हॉस्पिटलमध्येच करण्यात आले. यात सिग्माचे संचालक डॉ. उन्मेष टाकळकर, डॉ. अजय रोटे यांनी प्रत्यारोपण तर झेडटीसीसीचे समन्वयक मनोज गाडेकर, सिग्माचे समन्वयक संदीप चव्हाण, मनोज शिसराळे यांनी समन्वयाचे काम पाहिले. डोळे व हृदयाचे प्रत्यारोपण होऊ शकले नाही. लक्ष्मण यांच्या पश्चात पत्नी मुक्तासह तीन मुली व एक मुलगा आहे. लक्ष्मण त्यांच्यावर गुरुवारी सायंकाळी बदनापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# अवयवदान पदयात्रेला सुरवात

## औरंगाबाद ते तुळजापूर : जनजागृतीसाठी सहा जणांचा पुढाकार



# MGM, Global Hospital to join hands for affordable transplant



Times of India

# महिलेचे अवयवदान, प्रत्यारोपण यशस्वी



यकृत ग्लोबल हॉस्पिटल मुंबईला

एक किडनी कमलनयन बजाज हॉस्पिटल तर दुसरी एमजीएमला

डोळ्यांचेही बजाज हॉस्पिटलमध्ये प्रत्यारोपण

सकाळ वृत्तसेवा

दै. सकाळ 23/3/2016

# तो बनला अवयवदानाचे 'प्रतीक'

## अपघातात प्राण गेले; पण चौघांना जीवदान दिले

सकाळ वृत्तसेवा



प्रतीक वाहूळ

औरंगाबाद, ता. २२ : जेमतेम पंधरा वर्षे वय असतानाच अपघातामुळे जगाचा निरोप घ्यावा लागला; पण जाता जाता चौघांच्या आयुष्याला त्याने नवसंजीवनी दिली. प्रतीक वाहूळ असे या मुलाचे नाव. ब्रेनडेड झाल्यानंतर त्याच्या अवयवदानाची प्रक्रिया एमजीएम रुग्णालयात शुक्रवारी (ता. २१) पार पडली. त्यातून दोघांना किडनी, एकाला हृदय व एकाला यकृत, तर घाटी रुग्णालयात नेत्रदान करण्यात आले. यामुळे तो अवयवदानाचा प्रतीक ठरला. त्याच्या कुटुंबीयांच्या मनाचे मोठेपण व सकारात्मकतेमुळे चौघांची जीवनज्योत प्रज्वलित झाली.

एमजीएम रुग्णालयाचे वनअधिष्ठाता डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी अवयवदानाबाबत माहिती दिली. प्रतीक वाहूळ (वय १५, रा. मिसारवाडी) इयत्ता आठवीतील मुलगा.

तो दुचाकीवरून मित्रांसह १९ जूनला सायंकाळी घारच्या सुमारास जात होता. दुधडेअरी सिग्माजवळ दुचाकीला अपघात झाल्याने प्रतीकच्या डोक्याला गंभीर इजा झाली. एमजीएम रुग्णालयात अतिदक्षता विभागात त्याला दाखल करण्यात आले. २१ जूनला रात्री आठला त्याला डॉक्टरांच्या समितीने ब्रेनडेड घोषित केले. त्यानंतर अवयवदानाची प्रक्रिया शुक्रवारी पार पडली.

यात डॉ. राहुल सक्सेना (नागपूर), डॉ. सुधीर कुलकर्णी, डॉ. राहुल चौधरी, डॉ. संदीप जवळे, डॉ. नारायण सानप यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

### येथे पाठवले अवयव

| | | |
|---|---|---|
| यकृत | : | नागपूर (न्यू ऐरा हॉस्पिटल) |
| हृदय | : | मुंबई (फोर्टीस रुग्णालय) |
| एक किडनी | : | एमजीएम रुग्णालय औरंगाबाद. |
| दुसरी किडनी | : | बजाज रुग्णालय, औरंगाबाद. |
| दोन नेत्र | : | घाटी रुग्णालय, औरंगाबाद. |

### अशी झाली प्रक्रिया

- गुरुवारी प्रतीकच्या कुटुंबीयांकडून अवयवदानासाठी पुढाकार
- अवयवदानासाठी झाल्या विविध चाचण्या
- शुक्रवारी दुपारी अडीचला औरंगाबादेतून हृदय मुंबईला चार्टर विमानाने रवाना.
- याच चार्टर विमानासोबतच यकृत मुंबईमार्गे नागपूरला रवाना.
- ग्रीन कॉरिडॉर तयार करून पार पडली अवयवांची वाहतूक.

> अपघातानंतर प्रतीकच्या कुटुंबीयांनी अवयवदान केले. यात राज्यशासन व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मोठी मदत केली, त्यामुळे सर्व प्रक्रिया त्वरित व विनाअडथळा पार पडल्या.
> डॉ. सुधीर कुलकर्णी, मूत्रपिंडविकारतज्ज्ञ,
> एमजीएम रुग्णालय व झेडटीसीसीचे औरंगाबादेतील अध्यक्ष

# शहरात ६ महिन्यांत यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रियांना सुरुवात

दै. दिव्य मराठी 18/1/16

# अवयवदान चळवळीचा राम आदर्श

रामचे यकृत प्रत्यारोपण करणाऱ्या 'ग्लोबल' डॉक्टरांच्या टीमचा विश्वास, 'मटा'च्या कार्यालयात टीमचा गौरव



दै. महाराष्ट्र टाईम्स 18/1/16

वर्षभरात लिव्हर प्रत्यारोपण होईल : हेल्थकेअर सिटी म्हणून गौरव व्हावा, शहरातील नामवंत डॉक्टरां...

# ३ वर्षांत हृदयाचे प्रत्यारोपण



लोकमत परिचर्चा 28/1/16

प्रत्यारोपणासाठी तयारी...

महाराष्ट्र टाइम्स

दै. महाराष्ट्र टाईम्स 18/1/16

# एमजीएममध्ये वर्षभरात यकृत प्रत्यारोपण केंद्र

मुंबईच्या ग्लोबल हॉस्पिटलच्या सहकार्याने; कमी खर्चात उपचार देण्याचे प्रयत्न

दै. सकाळ 18/1/16

# महिलेच्या मूत्रपिंड प्रत्यारोपणाचे आदेश



महाराष्ट्र टाइम्स (२८/१/२०१६)

## YOUTH DIES OF HEART ATTACK AT AIRPORT

Lokmat Times (28/1/2016)

## एमजीएममध्ये आज अवयवदानावर चर्चा

दिव्यमराठी (२८/१/२०१६)

महाराष्ट्र टाइम्स (२८/१/२०१६)

# ...र्वांत हृदयाचे प्रत्यारोपण



विदेशातील परिस्थिती...

Aurangabad recently bagged limelight when a team of doctors of United CIIGMA Hospital successfully harvested kidneys, liver and heart of a brain-dead patient for transplant on needy patients. Against the backdrop of this breakthrough, Lokmat Times called eminent city doctors to discuss the need and scope of organ transplants of cadaver (brain-dead) patients in Aurangabad, recently. A report on the interaction with the team.





Lokmat Times (24/1/2016)

# दीड महिन्यात ११ जीव वाचले



महाराष्ट्र टाइम्स 24-2-16

# अवयवदानासाठी 'रिट्रायव्हल सेंटर' वाढण्याची गरज

महाराष्ट्र टाइम्स (२४/१/२०१६)

# ब्रेनडेड ओळखण्याचे फोर्टिसच्या तज्ज्ञांकडून धडे

सकाळ (२४/१/२०१६)



## लायन्सतर्फे 'नेफ्रॉलॉजिस्ट'चा सत्कार

किडनी दिना निमित्त

सामना (११/३/२०१६)



लायन्स क्लबतर्फे नेफ्रॉलॉजिस्टचा सत्कार

दिव्य मराठी (११/३/२०१६)

## मराठवाड्यात ९० जणांनी नोंदविली किडनीची मागणी

World Kidney Day

सकाळ (१०/३/२०१६)

## पाचव्या अवयवदानासाठी शहर सज्ज

सम्राट टाईम्स (२०/३/२०१६)

## शहरात पहिल्यांदाच होणार महिलेचे अवयवदान

दिव्य मराठी (२०/३/२०१६)

## पाचव्या अवयवदानासाठी एमजीएम सज्ज

सामना (२०/३/२०१६)

## दहा टक्के बालके किडनी विकाराने त्रस्त

दिव्य मराठी (१०/३/२०१६)

## लहान मुलांमधील किडनीच्या आजाराचे वाढते प्रमाण धोकादायक

सामना (१०/३/२०१६)

## लहान मुलांनाही मूत्रपिंड विकाराचा विळखा

लोकमत (१०/३/२०१६)

## अवयवदानाच्या ठिकाणीच व्हावे शवविच्छेदन

एमजीएम रुग्णालयात झाली अवयवदान चळवळीतील शंकांचे निरसन करणारी परिषद

दै. दिव्य मराठी 29/2/2016

# Drink plenty of clean water to keep kidney issues at bay

Avoid use of over-the-counter medicines, suggests Dr Kulkarni

ABRITA SHARAD
AURANGABAD, MARCH 9




Dr Sudhir Kulkarni

In the latest budget 2016, Finance Minister Arun Jaitely announced the launch of a National Dialysis Programme to address the high costs involved in the renal dialysis processes. At least 2,000 new dialysis centres will be started under the programme.

Though Maharashtra is already running free dialysis centres, the concentration of the Union Government on dialysis centres indicates how serious the kidney health scenario is, considering the rise in the number of lifestyle diseases like diabetes and blood pressure, some of the main causes of renal failure. Marathwada has 12 government dialysis units including six in Aurangabad, two each in Latur and Nanded and one each in Beed and Hingoli districts. MGM HoD Nephrology Dr Sudhir Kulkarni gave an insight into the trends of kidney related complaints. "Even though diabetes and blood pressure are the key factors that lead to renal failure, there are patients from rural area who do not have either of the disorders. Mainly, the environmental factors affect their organs of osmoregulation. Labourers working in sugarcane farm or any other farm work for long hours in a warm environment. Lack of water intake, consumption of alcohol, tobacco and smoking contribute to the renal failure in them," he said.

Talking about the kidney issues in the urban population, Dr Kulkarni reiterated the need of drinking plenty of clean water and a check on the consumption of Over-the-counter (OTC) medication. "Women are more prone to have kidney infections owing to sexual activities and pregnancy. Clean toilets in schools and workplaces are very important for women," said the nephrologist. One should drink at least 3-4 litres of water every day to keep the kidney-related issues at bay.




Lokmat Times (10/3/2016)

INSTITUTE OF HEALTH SCIENCES
Deemed University
NAVI MUMBAI